दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२०३ गुरुवार दि.०२ एप्रिल २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-203 Thursday, Dt.02 April 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# भर उन्हाळ्यात बीड परिसरात ढगफुटी...!

## वीज कोसळून पाली येथील माजी सैनिकाचा दुर्दैवी मृत्यू..!! आंब्यासह शेत पिकांचे प्रचंड नुकसान..!!!

बीड प्रतिनिधी

बीड शहर परिसर आणि जिल्ह्यात भर उन्हाळ्यामध्ये विजेच्या कडकडाटासह प्रचंड पावसाने साजरी लावली. सायंकाळी ४:३० वाजता सुरू झालेला पाऊस रात्री उशिरापर्यंत सुरू होता. पावसाळ्याला देखील लाजवेल अशाप्रकारे ढगफुटी सदृश्य पाऊस बीडकरांनी अनुभवला. या अवकाळी पावसामुळे आंब्यासह शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर वीज अंगावर कोसळल्याने बीड तालुक्यातील पाली येथील माजी सैनिक राऊत यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अवकाळी पावसामुळे सर्वत्र आहाकार उडाला आहे.

३१ मार्च रोजी अवकाळी पावसाने सायंकाळच्या वेळी हाजरी लावली. शासन आणि प्रशासन एकीकडे ३१ मार्च आर्थिक नियोजनाची घडी बसवण्यात आकडेमोड करण्यात व्यस्त असताना दुसरीकडे अवकाळी पावसाने अचानक डोके वर काढण्यास सुरुवात केली.यानंतर १ एप्रिल रोजी सकाळी उन्हाने आपला पुन्हा कहर सुरू केला.प्रचंड गर्मी होत असतानाच अचानक सायंकाळी चार वाजण्याच्या दरम्यान वातावरणात बदल सुरू झाला आणि पावसाळ्याला देखील लाजवेल अशा प्रकारे विजेच्या कडकडाटामध्ये ढगफुटी सदृश्य पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली. आतापर्यंतच्या इतिहासातील अवकाळी पावसाचा हा उच्चांक कदाचित ठरेल इतका जोरदार पाऊस झाला. रात्री उशिरापर्यंत अवकाळी पावसाचा कहर सुरू होता. या अवकाळी पावसामुळे बीड जिल्ह्याचे किती नुकसान झाले आहे याचा अंदाज आज समोर येईल. मात्र या अवकाळी पावसात



शेत पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. ज्यामुळे शेतकरी हवालदार झाला आहे. निसर्गाने देखील अनपेक्षितपणे अवकाळी पावसाचा कहर करत बीडकरांना एक प्रकारे एप्रिल फुलच केल्यासारखे नव्हे तर वास्तव सत्य नुकसानग्रस्त वातावरण झाले आहे.

### आज पाली येथे होणार अंत्यसंस्कार

पाली गावचे माजी सैनिक माजी पोलीस कै .वसंतराव रामराव राऊत यांचे १ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास वीज पडून अपघाती निधन झाले आहे.त्यांच्या पार्थिवावर आज २ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता पाली येथील शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



## इन बॉक्स

### भिवंडी बोडखा येथे सोंगांची परंपरा हनुमान जयंती उत्सव जल्लोषात



अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील भिवंडी बोडखा येथे गेल्या सहा दशकांपासून सुरू असलेली सोंगांची पारंपरिक परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. १९६५ पासून अखंड सुरू असलेला हा अनोखा सांस्कृतिक वारसा गावकऱ्यांसाठी अभिमानाचा विषय ठरत असून परिसरातील

पान २ वर...

## ना. पंकजाताई मुंडे यांनी मंत्रालयात घेतल्या विभागाच्या मॅरेथॉन बैठका ; संपूर्ण दिवस कामकाजात

### नद्या व उद्योगांचे प्रदूषण, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजनेचा घेतला आढावा

प्रभावी अंमलबजावणीसाठी पर्यावरण व पशुसंवर्धन सचिवांना दिले निर्देश

मुंबई /प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज त्यांच्या मंत्रालयातील दालनात भेटीगाठी बरोबरच विभागाच्या मॅरेथॉन बैठका घेतल्या. पर्यावरणाच्या बैठकीत नद्या व उद्योगांचे प्रदूषण, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प तर पशुसंवर्धन बैठकीत नव्यानेच सुरू झालेल्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजनेचा आढावा घेत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पर्यावरण व



पशुसंवर्धन सचिवांना निर्देश दिले.

ना. पंकजाताई मुंडे यांचा आजचा संपूर्ण दिवस शासकीय कामकाजात गेला. दुपारी कॅबिनेट बैठक झाल्यानंतर त्यांनी पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाच्या सचिव आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत वेगवेगळ्या विषयांवर एका मागोमाग एक अशा मॅरेथॉन बैठका घेतल्या.

वारंवार प्रदुषण करणाऱ्या उद्योगांची बँक गॅरंटी व दंडाची

पान २ वर...

## आकांक्षीत तालुका कार्यक्रमा अंतर्गत संपूर्णता अभियान २.० ची सखोल आढावा बैठका संपन्न



बीड ।प्रतिनिधी

आकांक्षीत तालुका कार्यक्रम अंतर्गत सुरु असलेले संपूर्णता अभियान २.० बद्दल जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये प्रगती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालयात येथे सखोल आढावा दि. ०१/०४/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाली. सोबतच वडवणी तालुक्यातील विविध विकास कामांचा सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्यात आला.

आकांक्षीत तालुका कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करणे, आणि पुढील उपाययोजना गावपातळीपर्यंत प्रभावी पद्धतीने राबवविणे असे या बैठकीचे उद्दिष्ट्य होते.सदरील बैठकीत आरोग्य, पोषण, शिक्षण,

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## हरवलेले नोंदणी प्रमाणपत्र बाबत सूचना...


सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, बीड जिल्हा पत्रकार संघ, बीड या नोंदणीकृत सार्वजनिक न्यासाचे नोंदणी क्र. एफ-९३३६ (बीड) असलेले नोंदणी प्रमाणपत्र दिनांक १२/०७/२०२३ रोजी आशा टॉकीज, बीड परिसरात हरवले आहे.

सदर बाबत शिवाजीनगर पोलीस स्टेशन, बीड येथे रितसर हरवल्याची नोंद करण्यात आलेली आहे.

कोणत्याही व्यक्तीस सदर नोंदणी प्रमाणपत्र सापडल्यास त्यांनी कृपया तात्काळ खालील पत्त्यावर/न्यासाकडे संपर्क साधावा. तसेच, या प्रमाणपत्राचा कोणीही गैरवापर करू नये, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**संतोष मानूरकर**
विश्वस्त
बीड जिल्हा पत्रकार संघ, बीड
नोंदणी क्र.: एफ-९३३६ (बीड)
संत नामदेव नगर,धानोरा रोड,

### अभयकुमार बंडूलालजी पांडे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन



धर्माबाद ।प्रतिनिधी

धर्माबाद शहरातील जैन समाजाचे प्रसिद्ध उद्योजक व प्रसिद्ध शेतकरी अभय कुमारजी बंडुलालजी पांडे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. धर्माबाद लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे कोषाध्यक्ष व व्यापारी मर्चंट असोसिएशनचे सचिव प्रतिष्ठित व्यापारी महेंद्र शेठजी पांडे यांचे ते काका होते. त्यांच्या पश्चात तीन मुले एक मुलगी पत्नी नातू नातवंड असा मोठा परिवार आहे. जैन समाजातील धार्मिक कार्यात अतिशय अग्रेसर म्हणून काम करणारे अभय कुमारजी बंडुलाल पांडे हे नाव तालुक्यात प्रसिद्ध आहे. त्यांच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

आज होणार अंत्यसंस्कार

त्यांच्या पार्थिवावर आज दिनांक ०२/ ०४/ २०२६ रोजी गुरुवार रोजी रामनगर समशानभूमी मध्ये सकाळी ११.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



संपादकीय....

# मिनी लोकसभा निवडणुकांचे वारे!

२०२९च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी होणाऱ्या पाच राज्यांतील निवडणुका महत्त्वाचे राजकीय संकेत देतील. या निवडणुकांचे निकाल केवळ प्रादेशिक सत्ता बदलापुरते मर्यादित नसून राष्ट्रीय राजकारणाच्या दिशेने देखील महत्त्वपूर्ण असतील.

भारताच्या राजकीय पटावर २०२६ हे वर्ष अत्यंत निर्णायक मानले जात आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका; पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी या केवळ प्रादेशिक सत्तांतराचा प्रश्न नसून देशाच्या व्यापक राजकीय प्रवाहाचे दिशानिर्देश ठरवणाऱ्या आहेत. लोकसभा निवडणुकांनंतर पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनमताची चाचणी होणार असल्याने या निवडणुकांकडे 'सेमीफायनल' म्हणूनही पाहिले जात आहे.

भारतीय राजकीय पटलावर येत्या महिन्यात होणाऱ्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका ही केवळ प्रादेशिक सत्ताबदलाचे प्रकरण नसून राष्ट्रीय राजकारणाच्या भविष्याची दिशा ठरवणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांमधील या निवडणुकांचे निकाल भारतीय राजकारणात नवीन समीकरणे निर्माण करतील आणि २०२९च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी राजकीय पक्षांची ताकद मोजण्याचे महत्त्वाचे मापदंड ठरतील. ही निवडणूक प्रक्रिया सुमारे १७ कोटींपेक्षा अधिक मतदारांना स्पर्श करणारी असून ८०० हून अधिक विधानसभा मतदारसंघांमध्ये लढती रंगणार आहेत. त्यामुळे याचे राजकीय परिणाम राष्ट्रीय राजकारणावर होईल.

पश्चिम बंगालमध्ये निजेर माती, निजेर लोक विरुद्ध सोनार बांगला!

पश्चिम बंगालमध्ये पुन्हा एकदा ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात थेट लढत पाहायला मिळणार आहे. २०२१च्या विधानसभा निवडणुकीत टीएमसीने २१३ जागा जिंकून आपले वर्चस्व कायम राखले होते, तर भाजपने ७७ जागा जिंकून मुख्य विरोधी पक्षाची भूमिका स्वीकारली होती. २०२१ मध्ये भाजपने मोठी झेप घेतली होती, परंतु सत्ता हस्तगत करण्यात अपयश आले. यावेळी भाजप संघटनात्मक ताकद, केंद्रातील सत्ता आणि राष्ट्रवादाचा मुद्दा घेऊन मैदानात उतरत आहे, तर तृणमूल स्थानिक ओळख, कल्याणकारी योजना आणि ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वावर भर देत आहे. ममता बनर्जींच्या नेतृत्वाखालील टीएमसीची राजकीय रणनीती मुळात बंगाली अस्मितेवर आधारित आहे. भाजपच्या बाजूने सुवेंदु अधिकारी यांचे नेतृत्व महत्त्वाचे ठरले आहे. त्यांच्याकडे टीएमसीच्या कार्यपद्धतीविरुद्ध भ्रष्टाचार आणि तुष्टीकरणाचे आरोप करण्याची धारदार राजकीय शैली आहे. सीमाभागातील सुरक्षा, बांगलादेशातून होणारी घुसखोरी, तसेच अल्पसंख्यांक मतांचे ध्रुवीकरण हेही निवडणुकीचे निर्णायक घटक ठरू शकतात.

तमिळनाडूमध्ये पुन्हा भ्रष्टाचार केंद्रस्थानी

तमिळनाडूमध्ये द्रविडीयन राजकारणाचा प्रभाव अजूनही कायम आहे. येथे द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांच्यातील पारंपरिक संघर्ष आहे, मात्र भाजप आता स्वतंत्र राजकीय शक्ती म्हणून उभे राहण्याचा प्रयत्न करत आहे. द्रमुक सत्तेत असल्यामुळे कल्याणकारी योजनांवर आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांवर भर देत आहे, तर विरोधक भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि प्रशासनातील त्रुटींचा मुद्दा उचलत आहेत. डीएमके आणि एआयएडीएमके या दोन मुख्य द्रविडीयन पक्षांच्या आलटूनपालटून राज्य करण्याच्या शर्यतीत आता अभिनेता विजयच्या तमिलगा वेत्री कझगमचा (टीव्हीके) नवा घटक जोडला गेला आहे.

# राजकारणातील धुरंदर नेतृत्व म्हणजे मा.श्री.आत्माराम फुंदे साहेब..!

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षितिजावर आपल्या कर्तृत्वाचा लखख प्रकाश पसरवणारे एक अभ्यासू, संयमी आणि तितकेच कणखर नेतृत्व म्हणजे मा. श्री. आत्मारामजी फुंदे साहेब. आज दि. २ एप्रिल रोजी त्यांचा वाढदिवस...या निमित्ताने त्यांच्या प्रदीर्घ आणि ध्येयप्रेरित प्रवासाचे सिंहावलोकन करणे औचित्याचे ठरेल.

मा. श्री. आत्माराम फुंदे हे व्यक्तिमत्व म्हणजे केवळ राजकारण नव्हे, तर समाजकारण आणि सहकार क्षेत्राचा एक अजोड संगम आहे. त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा पाया प्रशासकीय कौशल्याने रचला गेला. सन २००२ ते २००७ या काळात आष्टी पंचायत समितीचे उपसभापती म्हणून काम करताना त्यांनी विकासाचा जो धडाका लावला, तो आजही कौतुकाचा विषय ठरतो. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांची नाडी ओळखणाऱ्या या नेत्याने पाणी आणि निवारा या मूलभूत गरजांवर सर्वाधिक लक्ष केंद्रित केले. दुर्गम भागातील पाण्याची समस्या सोडवण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात हातपंप बसवून महिला भगिनींची पायपीट थांबवली, तर शेकडो गरीब कुटुंबांच्या डोक्यावर हक्काचे घरकुल उभे करून देण्याचे पुण्यकर्म त्यांनी केले. रस्ते, पाणीपुरवठा आणि मूलभूत सुविधांचे जाळे विणताना त्यांनी नेहमीच सामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अग्रक्रम दिला.

पंचायत समितीमधील त्यांच्या या यशस्वी कारकीर्दीनंतर, सहकार क्षेत्राने त्यांचे स्वागत केले. सन २००८ ते २०२२ या प्रदीर्घ काळात त्यांनी आष्टी तालुका दूध संघाचे चेअरमन म्हणून सलग १५ वर्षे धुरा सांभाळली. सहकार क्षेत्रात पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा कसा असावा, याचा वस्तुपाठच त्यांनी घालून दिला. भीषण दुष्काळी परिस्थितीत जेव्हा शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे मार्ग खुंटले होते, तेव्हा चेअरमन श्री. आत्माराम फुंदे साहेबांनी दूध संकलन अत्यंत सुरळीत ठेवून दूध उत्पादकांचे आर्थिक नुकसान होऊ दिले नाही. केवळ संकलनच नव्हे, तर दूध संघात आधुनिक यंत्रसामग्री, नवीन प्रक्रिया केंद्रे आणि तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देऊन त्यांनी या क्षेत्राला एक नवी दिशा दिली. तरुणांना सहकार चळवळीत आणण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी करण्यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार हा त्यांच्या दूरदृष्टीचाच भाग होता.




मा. श्री. आत्माराम फुंदे साहेब यांच्या नेतृत्वाचा खरा कस लागतो तो त्यांच्या शेकापूर या कर्मभूमीत. गेल्या २५ वर्षांपासून शेकापूर ग्रामपंचायतीवर त्यांचे निर्विवाद आणि प्रभावी नेतृत्व कायम आहे. एकाच गावात अडीच दशके लोकांचा विश्वास टिकवून ठेवणे, ही साधी गोष्ट नाही. ग्रामस्थांच्या समस्या असोत वा गावाचा सर्वांगीण विकास, श्री. आत्माराम फुंदे साहेब नेहमीच ढाल बनून उभे राहिले आहेत.

राजकारणातील त्यांची ही वाटचाल आष्टी विधानसभा मतदारसंघाचे दबंग आमदार तथा मराठवाडा भूषण, लोकनेते मा. श्री. सुरेश अण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक समृद्ध झाली आहे. अण्णांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख असून, तालुक्यातील विकासकामे तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी ते नेहमीच सक्रिय असतात. शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्यांच्या हक्कासाठी ठाम भूमिका घेणारा हा नेता सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील उपक्रमांनाही नेहमीच सढळ हाताने मदत करत आला आहे.

लोकाभिमुख नेतृत्व, पारदर्शक कारभार आणि आष्टी तालुक्याच्या विकासासाठी असलेली तळमळ हीच श्री. फुंदे साहेबांच्या यशाची त्रिसूत्री आहे. त्यांच्या कार्याचा अधिक विचार केला, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू ठळकपणे समोर येतो तो म्हणजे लोकांशी असलेली त्यांची जिव्हाळ्याची नाळ. कोणताही नागरिक आपल्या अडचणी घेऊन त्यांच्याकडे गेला, तर तो कधीही निराश परत येत नाही, अशी सर्वसामान्यांची भावना आहे. त्यांच्या कार्यालयाचे दरवाजे हे नेहमीच जनतेसाठी खुले असतात. प्रत्येक समस्येकडे ते केवळ प्रशासकीय दृष्टीकोनातून नव्हे, तर मानवी संवेदनांनी पाहतात, हेच त्यांच्या नेतृत्वाचे खरे वैशिष्ट्य आहे. शिक्षण क्षेत्रातही त्यांनी केलेले योगदान तितकेच मोलाचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले. शाळांच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करणे, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे, तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी वातावरण निर्माण करणे, या माध्यमातून त्यांनी अनेक तरुणांच्या भविष्याला दिशा दिली आहे.

क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांची आवड आणि पाठबळ कायम दिसून येते. गावपातळीवर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून ग्रामीण भागातील लपलेल्या गुणवंत खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. त्यामुळे युवकांमध्ये एक सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, त्यांना व्यसनांपासून दूर ठेवण्यातही मदत झाली आहे.

आजच्या बदलत्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीतही श्री. आत्माराम फुंदे साहेब आपली तत्त्वे आणि मूल्ये जपून काम करत आहेत. प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि लोकसेवेची अखंड तळमळ या बळावर त्यांनी जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. त्यांचे नेतृत्व हे केवळ आजच्या पिढीसाठीच नव्हे, तर येणाऱ्या पिढ्यांसाठीही प्रेरणादायी आहे. त्यांच्या या अथक कार्याला आणि समाजासाठीच्या समर्पणाला सलाम करत, अशा या अष्टपैलू आणि धुरंदर नेतृत्वास त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा. वाढदिवसाच्या या शुभदिनी त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिकाधिक यश लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना...!

शब्दांकन...
**- संस्कार राजेंद्र लाड, आष्टी**
(८६६८४४८४३३)

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२६६ दि.२५.०३.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अलीम समशेरखाँ पठाण रा.दुनगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आबेद अलिम पठाण | मुलगा | १५.१०.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५४ दि.०१.०४.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **आशा अबुद बादेला रा.माणकेश्वर ता.भूम जि.उस्मानाबाद** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आशा आबुद बादेला | स्वतः | १६.०६.१९७३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०५९ दि.-.-.-**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री राजेश गणेश राठोड, रा.राहुवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आरूष राजेश राठोड | मुलगा | २६.०१.२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२५५ दि.०१.०४.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **भिमराव पांडुरंग लेभे , रा.लेंभेवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | किशोर भिमराव लेंभे | मुलगा | १०.०५.२०१३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२५६ दि.०१.०४.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **भिमराव पांडुरंग लेभे , रा.लेंभेवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | भिमराव पांडुरंग लेंभे | स्वतः | ०५.०१.१९८५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१९२ दि.०१.०४.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **ताहेर बुऱ्हाण शेख, रा.भारडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ताहेर बुऱ्हाण शेख | स्वतः | ०७.०४.१९०१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५२१ दि.१७.१२.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **विलास नाथा टकले, रा.लोणार भायगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिवम विलास टकले | मुलगा | २८.०७.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२५४ दि.०१.०४.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री भिमराव पांडुरंग लेंभे, रा.लेंभेवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | भाग्यश्री भिमराव लेंभे | मुलगी | १२.०२.२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## पान १ वरून...

**आकांक्षीत तालुका ....**

कृषी आणि पायाभूत सुविधा यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये वडवणी तालुक्याच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यात आले, व त्याआधारे मा. जिल्हाधिकारी यांनी वरील विषयावर सविस्तर मार्गदर्शन करत सर्व निर्देशांक पूर्ण करण्या संदर्भात सूचना दिल्या.

आरोग्य विभागांतर्गत राबवण्यात येत असलेला विविध योजना व शासकीय आरोग्य केंद्र व उपकेंद्रावर गरोदर माता प्रसूती वाढवण्यासाठी तालुक्यातील जनतेस आव्हान केले आहे.शिक्षण विभाग अंतर्गत मुलींच्या सुरक्षितता व उच्च शिक्षण वाढावे आणि शाळा सोडण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी करून त्या मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात परत आण्यात करिता वडवणी तालुक्यामध्ये विवध ठिकाणी उउढत कैमेरे प्रस्थापित करणे, शिक्षणाचा स्तर उंचावणे, सर्व शाळेत कार्यरत शौचालये उपलब्ध असावे यासाठी पुढील उपाय योजना आखण्यात आल्या. कृषी क्षेत्रात रेशीम शेतीमध्ये मनरेगासोबत यशस्वी समन्वयावर चर्चा करत, राज्यामध्ये रेशीम उत्पन्नामध्ये प्रथम कसे येत येईल व बचत गटामार्फत निर्मिती, विक्री व शास्वत व्यवसाय स्थापित करण्याकरिता यासोबतच सौर ग्राम संकल्पनेवर आणि प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये नवीकरणीय ऊर्जेचे लाभार्थी वाढण्यासाठी विशेष मोहीम राबिवण्याचे निर्देश केले.

आढावा बैठकी दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गावपातळीवरील अंमलबजावणीची पडताळणी करण्यासाठी वडवणी तालुक्यात अंगणवाडी केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र- कुप्पा व ग्रामीण रुग्णालय- वडवणी चे उर्वरित कामे दर्जेदार आणि लवकर पूर्ण करण्यासंदर्भात सूचित केले.

सदरील आढावा बैठकी दरम्याण मा. जिल्हाधिकारी महोदयांनी आगामी प्रकल्पांमध्ये बचत गटांसाठी कायमस्वरूपी बाजारपेठ निर्माण करण्यासाठी बचत भवन आणि स्थानिक उपजीविकेला चालना देण्यासाठी 'उमेद मार्ट च्या बांधकामाचा समावेश, उसतोड कामगारांच्या बालकांसाठी निवासी वसतिगृह, कस्तुरबा गांधी बालिका विध्यालायाचा मॉडेल शाळा म्हणून समावेश व नवीन १३ अंगणवाडी केंद्रांना, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खढख) प्रशासकीय इमारत बांधकाम, वडवणी नगर पंचायत इमारत फर्नीचर साहित्य पुरवठा, ग्रामीण रुग्णालय चिंचवण येथील रुग्णालयास फर्नीचर पुरवठा करणेबाबत सोबतच जनसुविधा क सामाजिक वनीकरण, महाउर्जा अश्या अनेक कामांसोबत झच्- घणडणच् योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (चछठएत्रऋ-) अंतर्गत विविध विकास कामे, झच्- ऋहरीर्ज्ञीश्र योजना यशस्वीपणे राबवून आकांक्षीत तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला व भविष्यातील कार्ययोजनेत प्रशासनाने द्वारे वडवणीला एक आदर्श तालुका म्हणून विकसित करण्याच्या विश्वास व्यक्त केला आहे.

**ना. पंकजाताई मुंडे यांनी....**

रक्कम वाढविण्यासंदर्भात त्यांनी बैठक घेतली.बॅक गॅरंटी व दंडाच्या रकमेबाबत सन २०१३ पासून बदल झालेले नसल्याने यात बदल करण्यासाठी केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सूचना व इतर राज्यात कोणत्या प्रकारे कामकाज केले जाते यासंबंधीचा अभ्यास करून अहवाल तयार करावा. या अहवालावरून यासंदर्भातील प्रस्ताव पुढील तीन महिन्यात सादर करण्याचे निर्देश महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला दिले. तसेच यासंदर्भातील माहिती गोळा करून अहवाल तयार करावा. हे बदल करताना उद्योगस्नेही धोरण अवलंबण्याचे निर्देशही यावेळी दिले. तसेच प्रदुषण करणाऱ्या उद्योगांकडून

## पान १ वरून...

घेण्यात येणाऱ्या बँक गॅरंटी व दंडासंदर्भात ऑनलाईन यंत्रणा उभारण्याचे निर्देशही यावेळी दिले.

नद्यांच्या प्रदूषणावर ऑनलाईन नियंत्रण

नद्यांच्या प्रदुषण नियंत्रणासाठी ऑनलाईन तपासणी यंत्रणा उभारण्यासंदर्भात घेतलेल्या बैठकीत नमामी गंगा उपक्रमात कशा प्रकारे तपासणी यंत्रणा उभारण्यात आली याचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प

घरगुती सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प व औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांचे पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ कंत्राटी तत्वावर उपलब्ध करून घेण्याचे निर्देश त्यांनी यंत्रणांना दिले. तसेच ज्या ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अद्याप सुरू झाले नाही, अशा ठिकाणच्या संस्थांना नोटिस देऊन लवकरात लवकर हे प्रकल्प उभारण्यासंदर्भात सूचना देण्याचे निर्देशही दिले. यावेळी पर्यावरण सचिव जयश्री भोज, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, सहसंचालक (जल) जगन्नाथ साळुंखे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजना

पशुसंवर्धन विभागाने नव्यानेच आखलेली मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेवून मार्गदर्शक सूचना केल्या. ग्रामीण भागातील पशूपालक उद्योजक व्हावेत, त्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडावी, योजनेचा लाभ सर्व सामान्य घटकांना व्हावा याकरिता योजनेची व्याप्ती आणि उद्देश याविषयी त्यांनी निर्देश दिले.बैठकीस विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, सह सचिव डॉ मराळे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

**भिवंडी बोडखा ....**

नागरिकांचाही याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

हनुमान जयंतीनिमित्त सकाळी धार्मिक वातावरणात पूजा-अर्चा व विविध कार्यक्रम पार पडतात. त्यानंतर सायंकाळी गणरायाच्या सोंगाने कार्यक्रमाची रंगतदार सुरुवात होते. रात्रभर पारंपरिक सोंगांची मेजवानी रंगत असून, पळापळीचे सोंग अडवण्याचे सोंग, शारदा-भारदा, गोजावणी, अस्वल, वाघ्या-मुरळी, पोतराज तसेच राम-लक्ष्मण यांसारखी विविध सोंगे सादर करून प्रेक्षकांचे मन वेधले जाते.पहाटेच्या सुमारास राम पाहऱ्यात आई भवानीची भव्य मिरवणूक काढून या सोंगांची सांगता करण्यात येते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी दुपारी पारंपरिक कुस्ती स्पर्धा आयोजित करून उत्सवाची सांगता केली जाते.या दोन दिवसीय सोहळ्यासाठी गावातील नातेवाईक, जावई तसेच आसपासच्या खेड्यांमधील महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.या परंपरेला बळकटी देण्यात नाथा डावकर, अमूर्तराव हिलवडे, आप्पा मुंजाळ, भाऊराव डावकर, भिवंसन गाढे, सखाराम बेडेकर, दादासाहेब डावकर, रामभाऊ जिजा, नारायण सोनार, दत्ता डावकर या ज्येष्ठ सोंगाड्यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.आजच्या घडीला तरुण पिढीही या परंपरेत उत्साहाने सहभागी होत असून, भिवंडी बोडखा गावात हा सांस्कृतिक उत्सव दोन दिवस आनंद, भक्ती आणि परंपरेच्या रंगात रंगून जातो.

# उष्माघातापासून बचाव, लक्षणे आणि उपाययोजना

बीड - येणाऱ्या काही दिवसामध्ये आपल्या भागात उष्णतेची लाट जाणवू शकते, उष्मघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यावा उष्माघाताची लक्षणे आढळून झाल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करुन घ्यावा.

या उष्णतेच्या काळात उष्माघात होऊ नये. यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे गरजेचे आहे.उष्मघात उपचारासाठी शासकीय रुग्णालयांत सज्जता ठेवण्यात यावी अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या आहेत.उष्मघात होण्याची कारणे साधारणत: पुढील आहेत. यात उन्हामध्ये शारिरीक श्रमाचे, मजूरीचे कामे फार वेळ करणे,

कारखान्याचे बॉयलर रुममध्ये काम करणे, काच कारखान्यातील काम करणे, जास्त तापमानाच्या खोलीत काम करणे, घट्ट कपड्यांचा वापर करणे, उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबध येणे. उष्मघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करुन घ्यावेत. यासाठी उष्माघात उपचारांसाठी शासकीय रुग्णालयात सज्जता ठेवण्यात यावी.

जोखमीचे गट

वय ५ वर्षापेक्षा कमी व ६५ वर्षापेक्षा जास्त, कष्टाची सवय नसणारे लोक, धुम्रपान, मद्यपान करणारे आणि कॉफी पिणारे व्यक्ती, मुत्रपिंड,-हदयरोग,यकृत, त्वचा विकार लठ्ठपणा, मधूमेह, उच्च रक्तदाब इत्यादी रुग्ण. ऊ्‌ळीीशींळलश रपींळ रश्रश्रशीसळश ीरपसळश्रशीं ींळीींश्ररपींी शींश या औषधाचे सेवन सुरु असलेले रुग्ण, जास्त् तापमान, अति आद्रता, वातानुकुलनाचा अभाव, तंग कपडे, शेत काम, कारखान्यातील काम ऊन आणि उष्णतेशी संबधीत व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती.

प्रतिबंधात्मक उपाय

वाढत्या तापमानाच्या वेळेत कष्टाची कामे टाळणे, कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमान असताना करावी, उष्णता शोषुन घेणारे कपडे उदा. काळया किंवा भडक रंगाचे कपडे वापरु नयेत. सैल व उष्णता परावर्तित करणारे पांढ-या रंगाचे कपडे वापरावेत. जल संजीवनीचा वापर करावा, पाणी भरपूर प्यावे. सरबत प्यावे, उन्हामध्ये काम टाळावे व सावलीत विश्रांती घ्यावी. शक्यतो उन्हात फिरण्याचे टाळावे. आवश्यकता असल्यास उन्हात जाण्यापूर्वी भरपूर पाणी प्यावे. किंवा लिंबू शरबत प्यावे. उन्हात जाण्या आगोदर जेवन करावे, रिकाम्या पोटी उन्हात जाऊ नये. कान व डोक्याचा उन्हापासून बचाव करणे आवश्यक आहे. डोक्याभोवती पांढरा रुमाल गुंडाळावा. गॉगल्स व हेलमेट वापरावी. वृध्दांना व बालकांना उन्हात फिरु देऊ नये.

उपचार

रुग्णास हवेशीर खोलीत ठेवावे, खोलीत पंखे, कुलर ठेवावीत शक्यतो वातानकुलीत खोलीत ठेवावेत. रुग्णाच्या शरिराचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रुग्णाला बर्फाच्या पाण्याने अंघोळ घालावी. रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्या. आईसपॅक लावावेत, ओआरएस सोल्युशन द्यावे. उन्हाळ्यामुळे उष्माघाताचे रुग्णावर उपाययोजना करण्यासाठी व मृत्यू टाळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी, कुटीर रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांनी आवश्यक ती सर्व तयारी ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे. उदा. हवेशीर खोली, पुरेशी औषधी, सलाईनचा साठा, खोलीत पंखे, कुलर इत्यादी सुस्थितीत ठेवावी. बर्फाच्या उपलब्धतेसाठी फ्रिज सुस्थितीत असणे आवश्यक आहे. उष्मघाताची कारणे लक्षणे प्राथमिक उपचार त्याचप्रमाणे उष्मघात होऊ नये म्हणून घ्यवयाची काळजी याची माहिती आरोग्य शिक्षणाव्दारे प्रचार माध्यमातुन द्यावी.

काय करावे: तहान नसली तरी भरपूर पाणी,सरबत प्यावे, हवा खेळती राहण्यासाठी पंख्याचा वापर करावा, सैल व सौम्य रंगाचे सुती कपडे वापरावेत, सावलीत थांबणे, हळुवार चालावे, टोपी, फेटा चष्मा वापरणे, मजूर वर्गास वारंवार विश्रांती घेवु द्यावी, उन्हातुन आल्यावर चेह-यावर ओले कापड ठेवावे,

काय करावे काय टाळावे

काय करावे:- तहान नसली तरी भरपूर पाणी सरबत प्यावे हवा खेळती राहध्यासाठी पख्यांचा वापर करावा. सैल व सौम्य रंगाचे सुती कपडे वापरावेत. सावलीत थांबणे, हळुवार चालावे, टोपी,फेटा, चष्मा वापरणे, मजूर वर्गास वारंवार विश्रांती घेऊ द्यावी. उन्हातुन आल्यानंतर चेह-यावर ओला कपडा ठेवावा.

काय टाळावे:- मद्य, सोडा, कॉफी, अती गार पाणी आदी पिणे टाळावे, गरज नसतांना उन्हात फिरणे, तंग व गडद कपडे वापरणे, सवय आहे. म्हणून उन्हात निघणे, अति व्यायाम करणे, बंद कारमध्ये राहणे, अति शारिरीक कष्टाचे कामे करणे. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२. ०० ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे. तसेच मोकळया हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी. अगदी साध्या व सोप्या उपाययोजनांव्दारे आपण उष्माघातापासून आपले संरक्षण करु शकतो असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यांनी केले आहे.

अगदी साध्या आणि सोप्या उपाययोजनाव्दारे आपण उष्मघातापासून आपले संरक्षण करु शकतो.चला तर मग प्रशासनाच्या या आवाहनानुसार काळजी घेऊया. उष्मघातापासून आपले आपण संरक्षण करुया.

# महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन

## राज्यातील ५४ नदी प्रदूषित पट्ट्यांबाबत पूनरूज्जीवन प्रकल्प राबविणार

राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नदी संवर्धन-पुनरूज्जीवन करण्यासाठी नियामक आणि विकासात्मक अशी दोन्ही कामे करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेच्या धर्तीवर राज्यात स्थापन करण्यात येणाऱ्या या प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील, तर उपाध्यक्ष पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री असतील. वित्त मंत्री, नगरविकास मंत्री, जलसंपदा मंत्री, उद्योग मंत्री, ग्रामविकास व पंचायतीराज मंत्री सदस्य असतील पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सचिव हे सदस्य-सचिव असतील.

भारतात १० प्रमुख नद्या आहेत. त्यापैकी ४ नर्मदा, तापी, गोदावरी व कृष्णा या महाराष्ट्रात आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२५ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार देशभरात २९६ प्रदूषित नदी-पट्टे असून त्यापैकी सर्वाधिक प्रदूषित नदी-पट्टे ५४ महाराष्ट्रात आहेत. यात मिठी, काळू, मुळा, मुळा-मुठा, मुठा, भीमा, पवना, नाग, चंद्रभागा, पंचगंगा अशा नद्यांचे प्रदूषण-पुनरूज्जीवन याबाबत निर्णय घेता येणार आहे. त्यानुषंगाने नदी पुनरूज्जीवनाच्या सर्व पैलूंना चालना देणारी प्रमुख संस्था-नोडल एजन्सी म्हणून तसेच सर्वोच्च निर्णय घेण्यासाठी प्राधिकरण काम करणार आहे.

प्राधिकरण या ५४ प्रदूषित नदी पट्टयांसाठी पुनरूज्जीवनासाठी टप्प्याटप्प्याने प्राधान्यक्रम निश्चित करेल. विविध योजनांचे एकत्रिकरण करून पूरक धोरणांची म्हणजेच सांडपाणी प्रक्रिया, औद्योगिक सांडपाण्यासंबंधात उपाययोजना, अतिक्रमणे रोखण्यासाठी नदीकाठचे क्षेत्र निश्चित करण्यासाठी शिफारस करेल. प्राधिकरण अंमलबजावणीसाठी विविध विभागांदरम्यान समन्वय साधेल तसेच जनजागृती, लोकसहभाग वाढविण्यासाठी आराखडे तयार करेल. नदी खोरे व्यवस्थापन आराखडे तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे, भूसंपादन, अतिक्रमणे, वीजपुरवठा आणि करारांचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी या प्राधिकरणाकडे असेल.

प्राधिकरणात पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती तसेच एक समर्पित सचिवालयही काम करणार आहे. या सचिवालयात विविध स्वयंसेवी संस्था, पर्यावरण व जैवविविधता क्षेत्रात काम करणाऱ्या बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी-बीएनएचएस, मॅन्ग्रोव्ह सेल अशा संस्थांचाही समावेश असेल.

प्राधिकरणासाठी आवश्यक २ हजार कोटींचा निधी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून उभारण्यास तसेच शासनाचे योगदान म्हणून १०० कोटींचा निधी देण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच गौण खनिज उत्खननातून मिळणाऱ्या रकमेच्या १० टक्के इतका निधी दरवर्षी प्राधिकरणास देण्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय विविध कंपन्यांकडून मिळणारा सामाजिक दायित्व निधी, विविध वित्तीय संस्थांकडून होणारा मिश्र वित्त पुरवठा या माध्यमातून प्राधिकरणासाठी निधी उभारला जाणार आहे.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते ऊसतोड कामगारांना ओळखपत्रांचे वितरण

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात ऊसतोडणी कामगाराच्या सर्वेक्षणाचे काम सुरू झाले असून दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर एकूण ५८४५ ऊसतोड कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते १ एप्रिल, २०२६ रोजी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत प्रातिनिधिक स्वरूपात १० ऊसतोड कामगारांना ओळखपत्राचे वितरण करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ, पोलीस उपअधीक्षक (गृह) उमाशंकर कस्तुरे, स्मार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड यांचे प्रतिनिधी सागर बोरा, सहायक आयुक्त, समाजकल्याण प्रदिप भोगले हे उपस्थित होते.

उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल सुमोटो याचिका क्रमांक १/२०२३ मध्ये उच्च न्यायालयाने दिनांक १७/३/२०२५ रोजी ऊसतोड कामगारांच्या समस्यांबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश राज्य शासनास दिले. त्या अनुषंगाने राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक २८/४/२०२५ च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित केली आहे.

सदर समितीची बैठक दिनांक १ एप्रिल, २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये किमान ३ वर्षापासुन ऊसतोड कामगार म्हणून काम करीत असलेल्या ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून नोंदणी करणे व त्यांना ओळखपत्र देणे या विषयावर सविस्तर चर्चा झाली, ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून त्यांची नोंदणी करणे व त्यांना ओळखपत्र देण्यासाठी शासनाने स्मार्ट सर्विसेस



प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या संस्थेची नियुक्ती केली आहे.

जिल्हाधिकारी यांनी संस्थेच्या प्रतिनिधींना ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षणाचे काम जिल्हा प्रशासनाशी समन्वय ठेवून पुढील तीन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या तसेच खऱ्या ऊसतोड कामगारांची नोंदणी सूचना दिल्या. सोबतच बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांना संबंधित संस्थेकडे नोंदणी करण्यासाठी स्थानिक पातळीवर संपर्क करण्याचे आवाहन केले.

# भूमि अभिलेख विभागात आता भूकरमापक पदाऐवजी परिरक्षण भूमापक पद

भूमि अभिलेख विभागातील गट क संवर्गातील भूकरमापक हे पद रद्द करून परिरक्षण भूमापक असे पद निर्माण करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. ही पदे रद्द करण्यात आलेल्या भूकरमापक संवर्गातून नियमित पदोन्नतीने व विभागीय परीक्षेद्वारे प्रत्येकी ४० टक्के आणि सरळसेवेने २० टक्के या प्रमाणात भरली जातील.

मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने भूमि अभिलेख विभागाचा सुधारित आकृतीबंध तयार केला आहे. यामध्ये नियमित ९ हजार ६३८ आणि कंत्राटी १ हजार ४५ अशा एकूण १० हजार ६८३ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी भूकरमापक व परिरक्षण भूमापक या संवर्गामध्ये एकूण ६ हजार ९३७ पदे मंजूर आहेत. भूकरमापक पदाच्या शैक्षणिक पात्रता आणि कामाचे स्वरुप पाहता, त्यांना विहित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार महसूल विभागाने हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केला. भूकरमापक संवर्ग रद्द करुन ही पदे पदोन्नती व विभागीय परीक्षेद्वारे टप्प्याटप्प्याने परिरक्षण भूमापक संवर्गामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत.

भूकरमापक पदे टप्याटप्याने परिरक्षण भूमापक संवर्गामध्ये समाविष्ट झाल्यानंतर हा एकच संवर्ग अस्तित्वात राहील. तसेच गट क संवर्गामध्ये नियुक्तीचा प्रथम स्तर संवर्ग असेल. या संवर्गातील कर्मचाऱ्यांची एकत्रित ज्येष्ठता यादी प्रादेशिक स्तरावर ठेवण्यात येणार आहे. या दोन्ही पदांची कर्तव्य व जबाबदारी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे हे निश्चित करतील. तर सेवाप्रवेश नियम सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने सुधारित करण्यात येतील.

# ७ महर्षी वाल्मिकी ऋषी चौकात प्राणघातक अपघातांची संख्या वाढली

## तेलंगणा बसचा अंदाज चुकून चारचाकी वाहनाला मागून उडविले

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद तालुक्यात दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण वाढून आल्याचे स्पष्ट दिसत असताना महर्षी वाल्मिकी ऋषी चौकामध्ये भैसा तेलंगाना बसने चार चाकी वाहनाला मागून उडविले. त्यात जीवित हानी नाही मात्र कार चालकाचा एकूण ६,२००० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची महिती सूत्रांकडून मिळाली.

बरेचदा त्या ठिकाणी असे अपघात होत असतात या पूर्वी देखिल एका इसमाचा ट्रक खाली चिरडून मृत्यू झाला. महर्षी वाल्मिकी ऋषी मुख्य चौक असुन महाराष्ट्र ते तेलंगणाला जोडणार रस्ता आहे. रहदारीचा मार्ग असल्यामुळे डी वाय एस पी ऑफिस वस्तीग्रह आयटीआय कॉलेज राजाराम काकांनी सहकार विद्या मंदिर असून मोठी बाजारपेठ आहे. ऑटो, स्कूल बस, मोटारसायकल, मोठ मोठी ट्रक, आणि त्यातच तेलंगणा बसचा थांबा यामुळे वाहतूक कोंडी व

ट्रॅफिक वर नियंत्रण नसल्याने असे अपघात घडतात की काय असा सवाल उपस्थित केला जात आहे. तेलंगाना बसेस चा थांबा महाराष्ट्र बस स्टॅन्ड या ठिकाणी आहे. परंतु मनमानी कारभारामुळे महर्षी वाल्मिकी ऋषी चौकातच बसेस थांबून इतर नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत आहे तहसीलदार साहेबांनी तेलंगाना डेपो मॅनेजर यांना पत्रव्यवहार केला तरी सुद्धा कोणाचं भय नसल्यामुळे हा बसेसचा बोगस कारभार त्या ठिकाणी चालतो आहे यामागे परिवहन विभाग व वाहतूक पोलीस यांचे धाब्यातील संबंध असल्याचे दिसून येत आहे तहसीलदारांच्या लेखी पत्रात स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे तेलंगणा बसेस महर्षी वाल्मिकी ऋषी चौक ऐवजी महाराष्ट्र बस स्टँड या ठिकाणी थांबाव्यात परंतु स्थानिक काही लोकांमुळे त्या बसेस तिथेच थांबा करीत वाहतुकीस अडथळा किरकोळ अपघात करीत असल्याचे स्पष्ट आहे किरकोळ अपघात जरी होत असला असून लोकांच्या व विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळण्याचा प्रयत्न तेलंगाना डेपो मॅनेजर वाहतूक नियमांची अपुरी अंमलबजावणी. करीत आहेत हे मात्र स्पष्ट झाले आहे.याकडे प्रशासनाने वेळीच लक्ष घालावेअपघात व वाहतूक रोखण्यासाठी पोलीस का कमी पडत आहेत. या गंभीर प्रकरणाकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज आहे. त्या ठिकाणी आठवड्यामध्ये तीन ते चार अपघात नक्कीच होतात.किरकोळ अपघात झाले तर आपसात मध्ये सेटलमेंट करून घेतात. मुख्य चौकामध्ये अपघाता मुळे जीव गेले. अजूनही जातील यात काही शंका नाही. अशा गंभीर प्रकरणाकडे कुठेतरी आळा बसावा याकडे प्रशासनाने वेळीच लक्ष घालावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

# राज्यातील हजारो दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये भरीव वाढ

राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे शिशुवर्ग ते आठवी, नववी ते दहावी तसेच अकरावी व बारावीत शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत भरीव वाढ होणार आहे.

महाराष्ट्राच्या व्हिजन डॉक्यूमेंटमध्ये शिक्षण आणि कौशल्य विकास वृध्दिंगत करणे असा मुद्दा समाविष्ट आहे. या उद्दिष्टाला अनुसरून दिव्यांगांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यात येत आहे. दिव्यांग सक्षमीकरण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या या योजना ८ ते ३४ वर्षे जुन्या आहेत. या योजनांमध्ये कालानुरूप बदल करणे आवश्यक असल्याने तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मध्ये दिव्यांगांना सामान्य व्यक्तीपेक्षा अधिक लाभ देण्याची तरतूद आहे. त्यानुसार दिव्यांगत्वाच्या सर्व २१ प्रकारातील राज्यातील शिशुवर्ग ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये, नववी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ८०० रूपये (निवासी), ६०० रूपये (अनिवासी), अकरावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा १००० रूपये (निवासी), ८०० रूपये (अनिवासी) शिष्यवृत्ती देण्यात येईल. यापूर्वी शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा १०० ते २०० रूपयांच्या दरम्यान होती. याशिवाय अकरावी व बारावीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क तसेच अंध विद्यार्थ्यांसाठी दरमहा १५० रूपये वाचक भत्ता आणि दरवर्षी प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेत १५०० रूपये अभ्यास दौऱ्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल. बैठकीत या योजनेसाठी अपेक्षित २३ कोटी ११ लाख रूपयांच्या आवर्ती तरतुदीस मान्यता देण्यात आली.फ

# सुभाषचंद्र बोस आपदा व्यवस्थापन २०२७ पुरस्कारासाठी अर्ज करावेत

बीड :- राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, भारत सरकार, यांचे मार्फत आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन पुरस्कार देवून सन्मानित केले जाणार आहे. आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात आपत्ती प्रतिबंध, आपत्ती पूर्वतयारी, आपत्ती सौम्यीकरण, शोध व बचाव कार्य, आपत्ती प्रतिसादाचे कार्य, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन अनुषंगाने संशोधन, नाविन्यपूर्ण संकल्पना आणि आपत्तीपूर्व सूचना प्रणाली या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन पुरस्कार २०२७ करिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत.

अर्ज कोण करु शकतात :

सदर पुरस्कारासाठी आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात कार्य करणारी भारतीय नागरिक असलेली व्यक्ती किंवा भारतीय संस्था अर्ज करु शकते.अर्जासाठी संपर्क: केंद्र सरकार मार्फत सदर पुरस्कारासाठी देण्यात आलेल्या पुढील लिंकवर ऑनलाईन अर्ज दाखल करावा. हींींिः// रुरीवी.सीं.ळप

अर्ज करण्यासाठी कालावधी : सदर पुरस्कारासाठी दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्था यांची नावे दि. २३ जानेवारी २०२७ या दिवशी सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती दिनी केंद्र शासनामार्फत जाहीर करण्यात येतील. सदर पुरस्काराच्या अधिक माहितीसाठी संबंधितांनी हींींिः// रुरीवी.सीं.ळप या वेबसाईटला भेट द्यावी. जिल्ह्यातील पात्र व्यक्ती आणि संस्था यांनी सदर पुरस्कारासाठी ऑनलाईन अर्ज दाखल करावेत, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांचे मार्फत करण्यात आले आहे.

# आशालता नागरे यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन

अहिल्यानगर ।प्रतिनिधी

शिर्डी येथील नागरे वस्ती, पानमळा परिसरातील रहिवासी मातोश्री श्रीमती आशालता मनोहर नागरे (वय ७४) यांचे अल्पशा आजाराने रविवार दि. २९ मार्च २०२६ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने नागरे परिवारावर शोककळा पसरली आहे.

त्यांची अंत्ययात्रा रविवारी सकाळी त्यांच्या राहत्या घरातून सकाळी ११ वाजता निघाली. शिर्डी येथील अमरधाम स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगे, नातेवाईक व मोठा परिवार



असा आप्तेष्ट परिवार आहे. त्यांच्या निधनाने नागरे परिवारासह परिसरात दु:खाची भावना व्यक्त होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच प्रार्थना. शोकाकुल दिपक मनोहर नागरे, अजय मनोहर नागरे, संदिप मनोहर नागरे, निलेश मनोहर नागरे, अशोक मार्तंड नागरे (दिर), श्रीकांत अशोक नागरे (पुतण्या) समस्त नागरे परिवार, शिर्डी.

# अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण

## विविध निवेदन, अर्जांबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती

**राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाबाबत उपवर्गीकरण समितीच्या अहवालावर राज्य मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झाल्यावर या विषयावर प्राप्त निवेदने, अर्जांचा विचार करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.**

बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षण उपवर्गीकरणासाठी पाटणा उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल सादर केल्यावर तो आज मंत्रिमंडळापुढे मांडण्यात आला. त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या निवेदने, सूचना व अर्जांचा विचार करण्याच्या दृष्टीने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीने याबाबतची कार्यवाही करून, एक महिन्याच्या मुदतीत अहवाल मंत्रिमंडळापुढे सादर करावा, असा निर्णय घेण्यात आला.

# विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या पूर्व तयारीसाठी बीड तालुक्यात दोन दिवसीय विशेष कैम्प चे आयोजन

बीड :-, मा. भारत निवडणूक आयोगाचे आदेशान्वये आगामी विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या पूर्व तयारीचे अनुषंगाने सद्याच्या मतदार यादीतील मतदारांचे यापूर्वी झालेल्या (सन-२००५) विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या अंतिम यादीतील मतदारांशी चर्रळिपस करण्याचे काम व इतर खालील कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश आहेत.

१ सन २०२४ ची मतदारयादी २००५ च्या मतदार यादीशी जुळविण्याचे काम (चर-ळिपस) करणे, २ संभाव्य दुबार मतदार नोंदी (ऊडए) पडताळणी, ३ फ़ोटो नुसार संभाव्य दुबार मतदार नोंदी (झडए) पडताळणी, ४ अस्पष्ट, धुसर, अमानविय फोटो, अताकीक फोटो (इश्रीी झर्हीं) बदलणे, ५ इेझ - उरश्रश्र ढे इङज ची कामे प्रगती पथावर आहेत. बीड तालुक्यातील ४५७ भागासाठी (२३०- बीड विधानसभा मतदार संघासाठी ३४५, २२८ गेवराई विधानसभा मतदार संघासाठी ७१ व २३२ केज विधानसभा मतदार संघासाठी ४१) एकुण ४५७ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इङज) यांच्या नियुक्त्या केल्या असून वरील कामे चालु आहेत.

बीड तालुक्यातील नागरिक आणि मतदारांनी वरील काम करुन घेण्यासाठी तालुक्यातील सर्व मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (इङज) दिनांक ०४ एप्रील २०२६ आणि दि. ०५ एप्रील २०२६ रोजी आपल्या मतदान केंद्रावर कार्यलयीन वेळेमध्ये (सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ पर्यंत) थांबुन विशेष कैम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी सर्व नागरीकांनी मतदारांनी आपल्या प्रभागाचे गावचे मतदान केंद्रावर जावून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इङज) यांचेशी संपर्क करुन त्यांना आपली २००५ चे मतदार यादीतील माहीती व इतर अनुषंगीक माहिती पुरवून आपली नावे मॅप करून घ्यावीत. बीड तालुक्यातील सर्व नागरिक आणि मतदारांनी या कॅम्पचा लाभ घ्यावा, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी कळविले आहे.

# अशोक जाधव 'एज्युकॉन शैक्षणिक सन्मान' पुरस्काराने सन्मानित

बीड (प्रतिनिधी):- मराठवाडा विभागातील शैक्षणिक क्षेत्रात आणि बीड शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारे ज्ञानेश्वर माऊली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोक जाधव यांना 'एज्युकॉन शैक्षणिक सन्मान' पुरस्काराने दिमाखदार सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

नवभारत / नवराष्ट्र समूहाच्या वतीने आयोजित हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा मंगळवार दि.३१ मार्च २०२६ रोजी हॉटेल ट्रीट इम्पेरियल, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला. यावेळी राज्याचे दुग्धव्यवसाय विकास, अपारंपारिक ऊर्जा आणि दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, आ.विक्रम काळे, दैनिक नवराष्ट्र नवभारत समूहाचे ग्रुप प्रेसिडेंट ए. श्रीनिवास, दैनिक नवराष्ट्र छत्रपती संभाजी नगर आवृत्तीचे सरव्यवस्थापक कल्याण पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सुधाकर मंचुके,




प्रा.सुनील कदम, बीड जिल्हा प्रतिनिधी रवी उबाळे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते. मराठवाडा विभागातील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय आणि अनमोल योगदान देणाऱ्या निवडक मान्यवरांना या पुरस्काराने गौरविण्यात येते.

अशोक अण्णा जाधव यांनी बीड शहरात आदर्श प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, स्वातंत्र्य सैनिक बन्सीधरराव जाधव प्राथमिक व माध्यमिक विद्यालय तसेच जिजामाता प्राथमिक विद्यालय, सौ. सी.बी. जाधव मुलींचे बालकाश्रम यांसारख्या नामांकित शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा घराघरात पोहोचविली आहे. त्यांच्या याच निस्वार्थ कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. अशोक अण्णांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातआनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संस्थेतील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी या सर्वांनी अण्णांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. हा सन्मान म्हणजे आमच्या शैक्षणिक परिवाराचा गौरव आहे अशा भावना यावेळी अशोक जाधव यांनी व्यक्त केल्या. पुरस्कार मिळाल्याबद्दल शहरासह, ग्रामीण भागातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

## शिवसेनेच्या संपूर्ण बीड जिल्हा संपर्कप्रमुखपदी

# मनोज शिंदे यांची नियुक्ती

बीड (प्रतिनिधी) शिवसेना पक्षाने राज्यभर संघटन अधिक सक्षम आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने व्यापक पातळीवर हालचाली सुरू केल्या असून, त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा संपर्कप्रमुखांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये बीड जिल्हा शिवसेनेच्या संपर्कप्रमुख पदी मनोज शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारधारेचा वारसा पुढे नेत, तसेच शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. शिंदे यांच्या निवडीमुळे बीड जिल्हा शिवसेनेला नवे बळ मिळाले असल्याची भावना जिल्हाप्रमुख अनिल जगताप,सचिन मुळूक,स्वप्नील गलधर,चंद्रकांत नवले यांनी व्यक्त केली

बीड जिल्ह्यात शिवसेना पक्ष संघटन

### शिंदे साहेबांच्या निवडीमुळे बीड जिल्हा शिवसेनेला बळकटी मिळणार:- जगताप, मुळूक,गलधर, नवले



अधिक प्रभावीपणे उभे राहावे आणि कार्यपद्धतीला गती मिळावी, या उद्देशाने मनोज शिंदे यांच्यावर संपर्कप्रमुख ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. मनोज शिंदे यांनी ठाणे महानगरपालिकेत पाच वेळा नगरसेवक म्हणून काम पाहिले असून सध्या ते नगरसेवक म्हणून कार्यरत आहेत. शिवसेनेची ओळख असलेली आक्रमक कार्यशैली, ठाम निर्णयक्षमता आणि संघटनात्मक कौशल्य ही त्यांची बलस्थाने मानली जातात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी जवळीक असल्यामुळे त्यांच्या नियुक्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या निवडीमुळे बीड जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये नवउत्साह निर्माण झाला असून पक्षकार्य अधिक जोमाने पुढे जाईल, त्यांचा अनुभव आणि नेतृत्वगुण यामुळे बीड जिल्ह्यात शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत होईल अशी भावना शिवसैनिकांमध्ये निर्माण झाली आहे

# शेती जमिनीवर अतिक्रमणाचा गंभीर प्रकार; कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) –

संत चोखामेळा सहकारी संस्था मर्यादित, परळी वै. यांच्या मालकीच्या शेती जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. सन १९६१-६२ पासून सभासद असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर शेजारील काही व्यक्तींनी बेकायदेशीर कब्जा करून बांधकाम सुरू केल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सर्व्हे नं. ४४० मधील मेसाजी आबाजी जगतकर व सिताराम भोजाजी जगतकर यांच्या सुमारे १० गुंठे जमिनीवर उत्तम भिमा राठोड व संतोष नामदेव राठोड यांनी अतिक्रमण करून थेट बांधकाम सुरू केले आहे. संबंधित बांधकाम तात्काळ थांबवून अतिक्रमण हटविण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच, सर्व्हे नं. ४३९ मधील रामकिशन मिराजी जगतकर यांच्या जमिनीवर रमेश उत्तम गित्ते यांनी १० ͵ १०० फुट जागेवर कब्जा




करत विहिरीचे साहित्य टाकले आहे. हे साहित्य तातडीने हटवून जमीन मूळ मालकांच्या ताब्यात देण्याची मागणी करण्यात आली आहे.याशिवाय, सर्व्हे नं. ४३९ मधील लक्ष्मण नारायण जगतकर व रानबा किशन ताटे यांच्या जमिनीवर एका शेजार्याने तब्बल एक ते दीड एकर क्षेत्रावर बांधकाम व तळ्याचे साहित्य टाकून अतिक्रमण केल्याचा आरोप आहे.

या सर्व प्रकरणामुळे संत चोखामेळा सहकारी संस्थेचे सभासद आक्रमक झाले असून, प्रशासनाने तात्काळ कारवाई करून अतिक्रमण हटवावे, अन्यथा आम्हाला सनदशीर मार्गाने आमरण उपोषणाला बसावे लागेल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित हस्तक्षेप करून बेकायदेशीर बांधकाम थांबवावे व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी मोकिंद कोंडीबा जगतकर, ब्रिजेस मेसाजी जगतकर, राजेभाऊ साधु मस्के, चंद्रकांत साधु इंगळे, मधुकर विश्वनाथ जोगदंड, राजेभाऊ विठ्ठल जगतकर आदींनी केली आहे. आता प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मोरवड गावात शेतकऱ्यांना ठिबक सिंचन वाटप व जलसंधारणातून विविध विकासाचा धडाका..!

जनतेच्या सहभागातून घडतोय आदर्श गाव- सरपंच विवेक अंडील

बीड /प्रतिनिधी

दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील डोंगरपट्ट्यावर वसलेले मोरवड (ता. वडवणी, जि. बीड) हे गाव विकासाच्या नव्या लाटेचा साक्षीदार ठरत आहे. या भागात पाण्याची तीव्र टंचाई असून त्याचा शेतीवर मोठा परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी ठिबक सिंचन प्रणाली शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.ही बाब लक्षात घेऊन एस.यू.डी. लाईफ फाउंडेशन व लोकसहभागाच्या माध्यमातून मोरवड गावातील शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी ठोस पावले उचलण्यात आली आहेत. या उपक्रमामुळे दुष्काळी भागातील शेतीला नवसंजीवनी मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. यावेळी बोलताना सरपंच विवेक अंडील यांनी सांगितले की, ठिबक सिंचनामुळे गावातील



शेतकऱ्यांना शंभर टक्के फायदा होणार असून उत्पन्नात वाढ होऊन त्यांची आर्थिक परिस्थिती निश्चितच सुधारेल. तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन व शेततळ्याची पन्नी टाकून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.सरपंचांनी पुढे सांगितले की, एस.यू.डी. लाईफ फाउंडेशन च्या माध्यमातून गावातील शाळेला वॉल कंपाऊंड देण्यात आला, सहा नवीन पाझर तलाव निर्माण करण्यात येत आहेत,जलसंधारणासाठी तब्बल ५०० जलकुंड उभारण्यात आले आहेत. तसेच डोंगर परिसरात ५,००० झाडांची लागवड करण्यात आली असून शेततळे तयार करण्यात आली आहेत. भविष्यातही उर्वरित विकासकामे करण्याचा मानस असल्याचे सांगत आले आहे यावेळी एस यु डी संस्थेचे संचालक राकेश कुमार, विजय पगारे,संस्थेचे कर्मचारी राम जाधव, तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १एप्रिल ते ४ एप्रिल दरम्यान

# राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाचे नवीन सत्र

### शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे

मुंबई : राज्यात आभाळी हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. १ एप्रिल रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे.

त्यानंतर १ ते ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे, असेही आवाहन करण्यात येत आहे.

# जनकल्याण परिषदेच्या चेअरमनपदी सुप्रसिद्ध आदित्य पटाईत यांची नियुक्ती

धर्माबाद / अशोक पडोळे

जलवायु एवं जनकल्याण परिषद या सेंट्रल दिल्ली मध्ये स्थापित असलेल्या, पर्यावरण आणि जनकल्याण परिषदेच्या महाराष्ट्र राज्याच्या चेअरमन पदी सुप्रसिद्ध संगीतकार, गायक आणि उद्यमशील नेतृत्व आदिश्री आदित्य रामचंद्र पटाईत उर्फ आदि रामचंद्र यांची नियुक्ती झाली आहे.

नदी स्वच्छता, पर्यावरण पूरक उपक्रम, आणि विकसित भारत या पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पावर आधारित युवा, महिला सक्षमीकरण, ग्राम विकास, सहकारातुन रोजगार निर्मिती, कला क्रीडा साहित्य, रोजगार, पर्यावरण, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, टाकाऊ पासून टिकाऊ, वोकल फॉर लोकल, अश्या अनेक उपक्रमांची जन सहभागातून परिपूर्ती करण्याचा उद्देश घेऊन ही संस्था कार्य करीत आहे.या साठीचे पाठबळ सरकार आणि उदयोजकांच्या माध्यमातून उभे करण्यासाठी महाराष्ट्रात राज्य स्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरावर उपक्रम राबविण्यात येत आहेत, उपक्रमावर आधारित जिल्हावार पदाधिकाऱ्यांचे नियुक्तीसत्र सुरु होत आहे अशी ही माहिती त्यांनी या प्रसंगी दिली आहे.



# सेवापूर्ती निमित्त शेख जकीयोदिन निजामुद्दीन सत्कारित

बीड प्रतिनिधी. वडवणी पंचायत समिती येथून सलग चाळीस वर्ष निष्कलंकित शासकीय सेवेतून दिनांक ३० मार्च रोजी सेवानिवृत्त झाले त्यानिमित्ताने बीड येथे एम ग्रुप च्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

बीड येथील जेष्ठविधीन्य एडवोकेट बाळासाहेब बाहेगव्हाणकर व अडवोकेट विलास जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये त्यांचा शाल श्रीफळ पुष्पहार बुके देऊन सत्कार करण्यात आला यावेळी वडवणी वकील संघाचे अध्यक्ष एडवोकेट ताजुद्दीन शेख ऍडव्होकेट रईस पठाण माजी सचिव एडवोकेट यासेर पटेल एडवोकेट माझी अडवोकेट सज्जात आली अडवोकेट फिरोज पटेल एडवोकेट सादिक एडवोकेट बिलाल इलियास एडवोकेट शशिकांत वाळुंजकर एडवोकेट कुलथे एडवोकेट बप्पा तावरे एडवोकेट शेख जावेद इत्यादी वकील बांधव उपस्थित होते त्यांना भविष्यात दीर्घायुष्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या

# साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १ हजार २३४ कोटी रुपयांची तरतूद

अहिल्यानगर जिल्ह्यातील चिखली (ता.श्रीगोंदा) तालुक्यातील साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १ हजार २३४ कोटी १३ लाख रुपयांच्या तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

साकळाई उपसा सिंचन योजना घोड धरणाच्या जलाशयावरील म्हसे या गावात उभी केली जाणार आहे. म्हसे गाव येथून चार टप्प्यांमध्ये पाणी उचलून ते श्रीगोंदा व अहिल्यानगर या दोन तालुक्यातील ३२ गावांसाठी वापरता येणार आहे. यामुळे या अवर्षणग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्यासह सुमारे ९ हजार ६०० हेक्टर क्षेत्रास सिंचन उपलब्ध होणार आहे. या योजनेत लाभक्षेत्रात विकेंद्रीत जलसाठे निर्माण केले जाणार आहेत. त्यामध्ये ल. पा. तलाव, पाझर तलाव, सिमेंट नाला बंधारे व गाव तलावांचा वापर केला जाणार आहे. या योजनेमुळे सिंचनासाठी १.६० टीएमसी व पिण्यासाठी ०.२० टीएमसी असा एकूण १.८० टीएमसी उपलब्ध होणार आहे.

# अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी मौजे नवसारी येथील जमीन

अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी मौजे नवसारी येथील १६ हजार ७०८ चौ.मी.जमीन देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

अमरावती महानगरपालिकेला क्रीडा संकुलासाठी ही जमीन देण्यात आली होती. आता या जमिनीचा अंतिम ताबा देण्यास तसेच आतापर्यंत केलेल्या वाणिज्य वापरासाठी आकारण्यात आलेले शुल्क माफ करण्यास मान्यता देण्यात आली. याबाबत अमरावती महापालिकेने विनंती केली होती. यामुळे या जागेवर क्रीडा सुविधांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

# जिल्हयासाठी ३ स्थानिक सुट्टया जाहीर

बीड :- जिल्हाधिकारी बीड यांच्या अधिकारात असणा-या वर्षातील ३ स्थानिक सुट्टयांबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार चालु वर्षात ३१ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजी तिस-या श्रावणी सोमवारी पहिली स्थानिक सुट्टी असणार आहे.ज्येष्ठगौरी पूजन शुक्रवार दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी दुसरी स्थानिक सुटी असेल. त्यानंतर ६ नोव्हेंबर २०२६ रोजी धनत्रयोदशी निमित्ताने जिल्हयासाठी तिसरी स्थानिक सुटी असेल.या तीन सुटया जिल्हयातील सर्व राज्य शासकीय कार्यालये, जिल्हा परिषद अंतर्गत कार्यालये, नगर परिषद कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये, कोषागार आणि उपकोषागार कार्यालये तसेच इतर शैक्षणिक संस्थांसाठी आहेत. जिल्हयातील दिवाणी व फौजदारी न्यायालये तसेच केंद्र शासनाची कार्यालये आणि बँका यांना ही सुटी लागू राहणार नाही.

## सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांनी

# मासिक विवरणपत्र ३१ एप्रिलपूर्वी ऑनलाईन सादर करणे बंधनकारक

लातूर : सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांना कार्यरत मनुष्यबळाची माहिती दर्शविणारे त्रैमासिक विवरणपत्र ईआर-१ प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत ऑनलाईन सादर करणे सेवायोजन कार्यालये रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणारा अधिनियम १९५९ व त्याअंतर्गत नियमावली १९६० नुसार बंधनकारक असल्याने विवरणपत्र तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

केंद्र व राज्य शासन, अंगिकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका, तसेच खाजगी क्षेत्रातील आस्थापनांना ईआर-१ विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सेवायोजन कार्यालयाचे हींींि:// ेक्षसरी.ारहिुूरा.सीं.ळप या वेबपोर्टलवर नियोक्त्यांच्या लॉगइन मध्ये ईआर-१ सादर करताना पोर्टलवर एम्प्लॉयर (लिस्ट अ जॉब) वर क्लीक करुन एम्प्लॉयर लॉगइन मध्ये युजर आयडी व पासवर्ड वापरुन लॉगईन करुन डॅशबोर्डवरील ईआर-१ ऑप्शनवर क्लीक करावे, त्यानंतर एंटर ईआर-१ वर क्लीक करुन तिमाही विवरणपत्र ईआर-१ ऑनलाईन सादर करता येईल. याचा वापर करुन ३० एप्रिल, २०२६ अगोदर ईआर-१ विवरणपत्र सादर करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे. हे विवरणपत्र सादर करताना काही तांत्रिक अडचण आल्यास ०२३८२-२९९४६२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# महेश साखर कारखान्यातील कोट्यवधींची मशिनरी चोरीला - माजी आ.भीमराव धोंडे यांचा मोठा गौप्यस्फोट

संशयितांची नावे निष्पन्न,लवकरच गुन्हे दाखल होणार


आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्याची कामधेनू असा लौकिक असलेला आणि अनेक वर्षे बंद अवस्थेत असलेला कडा सहकारी साखर कारखाना पुन्हा एकदा सुरू करण्यासाठी सध्या युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मात्र, शेतकऱ्यांच्या या आशादायी चित्राला गालबोट लावणारी एक अत्यंत धक्कादायक घटना आता समोर आली आहे. कारखान्याच्या उभारणीचे काम अंतिम टप्प्यात असतानाच, आवारातून तब्बल कोट्यवधी रुपयांच्या मशिनरीची चोरी झाली आहे. या प्रकरणातील संशयितांची नावे निष्पन्न झाली असून, लवकरच याप्रकरणी पोलिसांत रीतसर गुन्हे दाखल केले जातील असा मोठा गौप्यस्फोट माजी आ. भीमराव धोंडे यांनी केला आहे. आष्टी येथील भगवान महाविद्यालयात बुधवारी दि. १ एप्रिल आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अशोक साळवे उपस्थित होते.

माजी आ. धोंडे यांनी महेश कारखान्याच्या उभारणीचा, आतापर्यंत आलेल्या संकटांचा आणि सद्यस्थितीचा सविस्तर आढावा पत्रकारांसमोर दिला.

अडचणींचा डोंगर पार करत कारखाना अंतिम टप्प्यात - माजी आ. धोंडे यांनी माहिती देताना सांगितले की, आष्टी आणि परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी व स्थानिक अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्यासाठी महेश सहकारी साखर कारखाना कोणत्याही परिस्थितीत सुरू करण्याचा आम्ही निर्णय घेतला. या संपूर्ण प्रवासात अनेक मोठी आर्थिक, प्रशासकीय आणि तांत्रिक संकटे उभी राहिली. परंतु, या सर्व अडथळ्यांवर यशस्वीपणे मात करून आता कारखान्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या गाळप हंगामात कारखान्याचे धुराडे पेटलेले दिसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रकल्पामुळे केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर वाहतूकदार, पूरक उद्योग आणि स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. हा प्रकल्प तालुक्याच्या अर्थचक्राला मोठी गती देईल, असेही ते म्हणाले.

कोटच्यवधींच्या चोरीने खळबळ;सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह - कारखान्याचे काम अत्यंत वेगात आणि



सकारात्मक वातावरणात सुरू असतानाच अज्ञात चोरट्यांनी कारखान्याच्या महागड्या मशिनरीवर डल्ला मारल्याची गंभीर बाब माजी आ. धोंडे यांनी उघड केली. ही चोरी काही हजारांची नसून थेट कोट्यवधी रुपयांच्या घरात आहे. विशेष म्हणजे, या चोरीतील संशयितांची नावे आता समोर आली आहेत. त्यांच्यावर लवकरच पोलिसांत कठोर कारवाईसाठी अधिकृत तक्रार दाखल केली जाणार आहे. या मोठ्या चोरीमुळे कारखान्याच्या उभारणीच्या गतीवर थोडाफार परिणाम होण्याची शक्यता असली, तरी नियोजित वेळेतच प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रशासन आणि सर्व संबंधित यंत्रणा शर्थीचे प्रयत्न करत असल्याचे माजी आ. धोंडे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि अत्यंत जड असलेली मशिनरी चोरीला गेल्याने कारखान्याच्या अडचणी वाढल्या आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कठोर कारवाई व्हावी अशी मागणी संचालक मंडळ, शेतकरी आणि नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

चोरी झाली तरी कारखाना सुरू होणारच - माजी आ. धोंडे यांचा निर्धार

महेश सहकारी साखर कारखाना ही या भागातील शेतकऱ्यांची जीवनवाहिनी आहे. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी आम्ही आतापर्यंत अनेक संकटे झेलली आहेत. आता या चोरीच्या प्रकाराने आम्ही अजिबात खचणार नाही. आमचा निर्धार पक्का असून, कोणत्याही परिस्थितीत येणाऱ्या हंगामात गाळप सुरू करून शेतकऱ्यांच्या अपेक्षा आम्ही पूर्ण करूच असा विश्वास माजी आ. भीमराव धोंडे यांनी व्यक्त केला आहे.

## 'मामाच्या गोव्याला जाऊया' चा मुहूर्त संपन्न 'स्ट्रगलर साला'

### नंतर विजू माने घेऊन येत आहेत नवीन धमाल चित्रपट

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या नव्या विषयांची आणि फ्रेश कंटेंटची लाट पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते विजू माने आता प्रेक्षकांसाठी मैत्री, मस्ती आणि आठवणींचा जल्लोष घेऊन येत आहेत. त्यांच्या आगामी 'मामाच्या गोव्याला जाऊया' या चित्रपटाचा मुहूर्त सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. 'स्ट्रगलर साला' या गाजलेल्या सीरिजनंतर विजू माने पुन्हा एकदा तरुणाईच्या जवळचा विषय घेऊन येत आहेत. चित्रपटाच्या नावावरूनच गोव्याची ट्रिप, मित्रांची धमाल आणि नात्यांमधली मोकळीक यांचा भन्नाट मेळ यात अनुभवायला मिळणार, याची चाहूल लागते. फ्रेंडशिप डेच्या आठवड्यात हा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याने, तरुण प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाबद्दल विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटाची नेमकी कथा आणि कलाकारांची फळी अद्याप गुप्त ठेवण्यात आली असली तरी, 'मामाच्या गोव्याला जाऊया' हे शीर्षकच प्रेक्षकांना आपल्या मित्रांच्या ग्रुपची आठवण करून देणारं आहे. दिग्दर्शक विजू माने सांगतात, 'स्ट्रगलर साला'ला प्रेक्षकांनी दिलेलं प्रेम माझ्यासाठी खूप खास आहे. त्या सीरिजमधील मैत्री आणि मस्ती लोकांच्या मनाला भिडली. त्याच भावनेतून 'मामाच्या गोव्याला जाऊया' ही कल्पना आकाराला आली. या चित्रपटातून प्रेक्षकांना मनमुराद



हसण्याचा, मित्रांसोबत घालवलेल्या क्षणांची आठवण करून देणारा आणि थोडासा नॉस्टॅल्जिक अनुभव देण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक मित्रांच्या ग्रुपमध्ये गोव्याला जाण्याचा प्लॅन केला जातो आणि तो फसतो, अशाच मित्रांची ही कहाणी आहे. हलक्याफुलक्या शैलीत सांगितलेली ही कथा प्रत्येकाला आपलीशी वाटेल. विजुमेनिया प्रायव्हेट (ओपीसी) प्रायव्हेट लिमिटेड निर्मित, विजू माने लिखित व दिग्दर्शित हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, 'मामाच्या गोव्याला जाऊया'च्या निमित्ताने पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर मैत्रीचा रंगतदार जल्लोष अनुभवायला मिळणार आहे. गोव्याच्या पार्श्वभूमीवर रंगणारी ही धमाल सफर प्रेक्षकांना केवळ हसवणारच नाही, तर आपल्या मित्रांसोबतच्या जुन्या आठवणींनाही उजाळा देणार, एवढं मात्र नक्की!

छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई



## सरकारने दिलेली कर्जमाफी ही विना अटी शर्ती सरसकट करावी – शेतकरी नेते अजित नवले

माजलगाव ।प्रतिनिधी

निवडणूक काळात दिलेल्या आश्वासना प्रमाणे कर्जबाजारी शेतकऱ्यांसाठीची संपूर्ण कर्जमाफी ची घोषणा करून महाराष्ट्र राज्याचे सध्याचे युती सरकार सत्तेवर आले सत्तेवर आल्यानंतर या सरकारने अटी शर्थी व मुदती घालून कर्जमाफीची घोषणा केली ती फसवी ठरू नये म्हणून दिलेल्या आश्वासना प्रमाणे विना अट विना शर्थ सरसकट कर्ज माफी करावी तसेच अनेक ऊस कारखानदारांनी शेतकऱ्यांची मागील तीन महिन्यात ऊस बिलांचे पेमेंट अदा केले नाहीत ती थकीत ऊस बिले त्वरित व्याजासह अदा करावीत अशी मागणी शेतकरी नेते, माकपचे राज्य सचिव कॉ. अजित नवले यांनी माजलगाव येथील पत्रकार परिषदेत केली.

भोंदू बाबा बरोबरच संपर्कातील नेत्यावर वर ही कार्यवाही व्हावी. सध्या महाराष्ट्रामध्ये गाजत असलेले नाशिक जिल्ह्यातील भोंदू बाबा प्रकरणी आरोपीवर कडक कारवाई करून यामध्ये सहभागी असलेल्या सर्व सरकारमधील मंत्री, ३९ आमदार व इतर राजकीय कार्यकर्त्यांवर सरकारने तात्काळ कारवाई करावी व या प्रकरणात ज्या पीडित महिलांचे व्हिडीओ सोशल मीडिया वर व्हायरल होत आहेत ज्या मुळे त्या पीडित महिलांच्या अब्रू बरोबरच पुरोगामी महाराष्ट्राची देशभर बदनामी होत आहे ते सर्व व्हायरल व्हिडिओ सोशल मीडियावरून काढून घ्यावेत अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे वतीने राज्य सचिव, शेतकरी नेते कॉ. अजित नवले यांनी पत्रकार परिषदेत केली.

राज्य सरकारवर कडाडून टिकाराज्यातील वाढत्या जातीय अत्याचाराच्या घटना व अंधश्रद्धा व भोंदूगिरीच्या घटनांना सध्याचे दुटप्पी भूमिका असणारे सरकार जबाबदार असून त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यातील भोंदुगिरी व वाढती गुन्हेगारी हे देवेंद्र फडणवीस यांच्या गृहखात्याचे अपयश असल्याची

टीका त्यांनी केली. सरकारने शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, शेतकऱ्यांचे थकीत ऊस बिल, पिक विमा हे प्रश्न लवकर नाही सोडवले तर येणाऱ्या काळात महाराष्ट्रात मोठे आंदोलन करण्यात येईल असा इशाराही यावेळी कॉ. अजित नवले यांनी दिला. या पत्रकार परिषदेला डॉ. अजित नवले यांच्यासह किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. अजय बुरांडे, अधख युवक संघटनेचे अध्यक्ष मोहन जाधव, ज्येष्ठ माकप नेते कॉ. मुसद्दीक बाबा सर, तालुका सचिव कॉ. शिवाजी कुरे, कॉ. कृष्णा सोळंके, लहू खारगे यांच्या सह अनेक पत्रकारांची उपस्थिती होती.

मोहन जाधव
(कम्युनिस्ट पक्ष माजलगाव)

## भक्ती शक्ती व एकनिष्ठतेचे प्रतीक: श्री हनुमान (हनुमान जन्मोत्सव दोन एप्रिल २०२६ )

हे अंजनीच्या सुता, तुला रामाचं वरदान, एक मुखाने बोला,बोला जय जय हनुमान.. चैत्र पौर्णिमेच्या दिवशी चिरंजीवी,संकट मोचन,बजरंग बली, मारुती ,महावीर, महाबलाढय देवता यांची जयंती असते. सप्तचिरंजीवीपैकी हनुमान हे चिरंजीव आहेत.कारण रावणाने सीतेचे अपहरण करून लंकेत घेऊन गेले होते.तेव्हा तिथे श्री श्रीराम भक्त हनुमान पोहोचले त्यांना सीतामाईंनी ओळखले व आशीर्वाद दिला. तुम्ही अजरामर रहाल.. म्हणून ते चिरंजीवी राहिले त्या सात मध्ये पौराणिक कथे नुसार महर्षी व्यास मुनी, कृपाचार्य, परशुराम, बिभीषण, राजा बळी , आणि अश्वत्थामा हे सांगितले जातात.श्रीराम भक्त हनुमान म्हणून ज्यांची या पृथ्वीतलावर ख्याती आहे. शक्तीचे रूप म्हणजेच बजरंगजी होय. श्रीराम प्रभू यांच्या सोबत आपले आयुष्य एकनिष्ठतेने पवित्र करणारे अंजनी सुपुत्र म्हणजेच मारुती राया आहेत. सबंध विश्वाला आदर काय असतो. महिलाप्रति कसे वागावे हे हनुमानजी कडून आपण सर्वांनी शिकावे.जन्म झाल्याबरोबर सूर्याला गिळायला जाणारा हा महापराक्रमी बजरंग बली यांचा जन्म अंजनी माता व केसरीनंदन पिता यांच्या पोटी झाला. त्यांना पवनसुत, वायुपुत्र म्हणून ओळखले जाते.

आज गावोगावी हनुमान जयंतीच्या निमित्ताने मंदिरात भजन, कीर्तन सप्ताह केले जातात. हनुमान चालीसाचे पठण ही सामूहिक रीतीने केले जाते. आपल्या आयुष्यात या महापराक्रमी व्यक्तीने अनेक जणांचे गर्वहरण केले.एकदा भीमाला त्याच्या शक्तीचा गर्व झाला होता. तेव्हा श्री हनुमानाने रस्त्यावर स्वतःची शेपटी टाकून बसले होते. तेव्हा तेथून भीम आपली गदा खांद्यावर घेऊन डुलत डुलत जात होता. त्यावेळी त्यांना वानराची शेपटी रस्त्यावर पडलेली दिसली; तेव्हा क्रोधीत



होऊन भीमाने हनुमंताला म्हणाला हे मर्कटा तुझी घाणेरडी शेपटी रस्त्यावरून बाजूला घे तेव्हा 'मी वृद्ध झालो आहे'?

मला माझी शेपटी उचलता येत नाही. असे मुद्दाम श्री हनुमानजीने वानराच्या रूपातून सांगितले. तेव्हा भीमाने आपल्या गद्याने ती शेपटी बाजूला करण्याचा भरपूर प्रयत्न केला.प्रयत्नांची पराकाष्ठा केली. संपूर्ण शक्ती एकवटली पण इंचभर सुद्धा शेपटी हलली नाही. यावरून भीमाने समजून घेतले, हे साधेसुध्दे वानर नव्हे. तेव्हा भीमाच्या शक्तीचे गर्वहरण झाले. श्रीहनुमानाने ही व्युक्ती वापरली म्हणून तुम्ही सर्वां सोबत चांगले रहा, चांगले वागा, चांगले बोला, खरे बोला,सत्य बोला, आयुष्यभर श्रीहनुमानानी श्रीराम प्रभू सोबत होते. त्यांचे दास,दूत,म्हणून ते राहिले. श्रीराम प्रभू व रावण युद्धात श्रीरामाचा विजय झाला. या युद्धात श्री हनुमान ध्वजावर आरुढ झाले होते. असे सांगितले जाते. ते शिवाचे अकरावे अवतार मानले जातात. त्यांना अष्टविधी आणि नवनिधीचे वरदान होते.दुष्ट रावणाने सीतेचे अपहरण केले. तेव्हा श्री हनुमानजींनी लंकेत जाऊन सीतेचा शोध लावला.आणि ही आनंदाची बातमी श्रीप्रभू रामचंद्राला सांगितले. सीतेला कळाले की हनुमानजी येऊन आपली माहिती घेत आहेत.या वानररुपी हनुमंताला पकडण्यासाठी क्रोधित झालेल्या दशाननाने त्यांच्या शेपटीला आग लावली.तेव्हा श्री हनुमानाने लंका पेटून दिली. व रावणाचे नामुष्की झाली. हनुमंत महाबळी ।दाढी रावणाची जाळी ।

असे म्हटले जाते. कारण त्याचा अर्थ असा आहे की रावणाला जो अहंकार झाला होता त्या अहंकाराचा हरण बजरंग बलीने केले.तेव्हा हनुमंताने आपले खरे विशाल रूप दाखविले. सांगण्याचा अर्थ असा आहे की, सत्य वचनी चालावे, एकनिष्ठ वागावे, इतरांना कधीच कमी लेखू नये. इतरांची थट्टा मस्करी करू नये, माणुसकीच्या मार्गाने चालले तर जीवन फलदायी होते.आज सर्वत्र मनोभावे त्यांची पूजा ,प्रार्थना, मंगलमयविधी मंदिरात केला जातो. हनुमान जी ने दगडावर राम राम लिहून दगड पाण्यात टाकले तेव्हा ते तरंगले, श्रीरामाने स्वतःचे नाव टाकून पाण्यात दगड सोडले तर ते बुडाले.याचा कारण तुमचा भाव किती आहे. यावर अवलंबून आहे. श्रीरामाचे बंधू लक्ष्मण यांना जेव्हा शक्ती लागली तेव्हा वीर हनुमानाने द्रोणागिरी पर्वत उचलून आणला. तेव्हा त्या पर्वतातून संजीवनी औषधी मिळाली .म्हणून बंधू लक्ष्मणाचे प्राण वाचले. म्हणूनच मारुतीला जय बजरंग बली म्हटले जाते. सर्वत्र श्री हनुमानाचे पूजन दररोज केले जाते. शनिवार हा त्यांचा वार आहे. लोकांच्या मनात एक निष्ठेतेची भावना आणणारी ही महान देवता आहे. वाईटाचा नाश व चांगल्याला आशीर्वाद त्यांनी दिला.श्रीराम प्रभू सोबत राहून त्यांची सेवा केली. त्यामुळे ते अजरामर नाते झाले. दृढ बनले की कधीही अलग होऊ शकत नाहीत. श्रीराम-रावण युद्ध संपले. श्रीरामाचा विजय झाला. सर्वत्र आनंदाची दिवाळी साजरी करून सनई चौघडे वाजू लागले. श्रीरामाने आपल्याला युद्धात मदत केलेल्यांना सप्रेम भेट म्हणून काही चीज वस्तू दिल्या. तेव्हा सीतामायने आपल्या गळ्यातील नवरत्नजडित हार हनुमान रायाला दिला. तेव्हा त्याने त्या हरातील मणी फोडून पाहिल्या.

त्यात श्रीराम लिहिले नव्हते. म्हणून त्यांनी तो रत्नजडित हार फेकून दिला.त्याचा राग सीतेला आला ; तेव्हा हनुमानाने आपली छाती फाडून राम सीता दाखविले तेव्हा त्यांना वास्तविकता कळाली, आणि आनंदोत्सव झाला. मित्रांनो सांगण्याचा अर्थ काय? युगानयुगे आपण या व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाची माहिती घेत असतो. कारण त्यांनी सामाजिक प्रतिष्ठा राखली. त्यामुळेच हनुमान जयंतीच्या निमित्ताने आज आपण त्यांचे पूजन करत आहोत. धन्य तुझे राम राज्य ।धन्य तुझी सेवा तुझे फक्त आम्ही सारे। उपाशी का देवा। घे बोलावून आता। कंठासी आले प्राण ।एक मुखाने बोला।बोला जय जय हनुमान।

आपण सुद्धा चांगलेच वर्तन करावे. व्यसनापासून दूर राहावे. महिलांचा आदर करावा.अंगात शक्ती वाढवावी. प्रत्येकास मदत करण्याचा प्रयत्न होता होईल तेवढा करावा हे आपल्याला येथे सांगता येईल. हनुमान जयंतीच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा ✻

✻साहित्यिक विठ्ठल गणपत बरसमवाड✻
संस्थापक: विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी ता. मुखेड जि.नांदेड

# आदर्श नायब तहसिलदार श्री.भगीरथ धारक यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

## जनसेवा हीच ईश्वर सेवा या भावनेतून काम करणारे आदर्श व्यक्तीमत्व

आष्टी - (राजेंद्र लाड) आष्टी तहसिल कार्यालयातील कर्तव्यदक्ष, प्रामाणिक व जनतेच्या मनात विशेष स्थान निर्माण केलेले नायब तहसिलदार श्री. भगीरथ चंद्रभान धारक हे मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या दीर्घकालीन व उल्लेखनीय शासकीय सेवेचा सन्मान करत तहसिल कार्यालयाच्या वतीने छोटेखानी पण अत्यंत भावनिक सेवापूर्ती सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. नुकतेच त्यांच्या मातोश्रींचे दुःखद निधन झाल्यामुळे कार्यक्रम अत्यंत साध्या स्वरूपात पार पडला. तरीही उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांच्या भावना व्यक्त होत असल्याने कार्यक्रमाला वेगळेच भावनिक स्वरूप प्राप्त झाले. यावेळी श्री. धारक यांचा शाल, श्रीफळ, हार, पुष्पगुच्छ, उभा पोषाख व पारंपरिक फेटा परिधान करून सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना निरोप देत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

श्री. भगीरथ धारक यांनी आपल्या सेवाकाळात कोणताही भेदभाव न करता प्रत्येक नागरिकांना समानतेने वागणूक दिली. तहसिल कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्यांनी आत्मीयतेने मार्गदर्शन केले. मग ती व्यक्ती सामान्य नागरिक असो, शेतकरी असो, राजकीय नेते असोत, दिनदलित अथवा गोरगरीब असोत प्रत्येकाशी त्यांनी समान आदराने वागून त्यांची कामे मार्गी लावली. सबका साथ, सबका विकास आणि सर्वधर्म समभाव या तत्वांचा त्यांनी प्रत्यक्ष कार्यात अवलंब केला. त्यामुळेच तालुक्यातील नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल अपार विश्वास निर्माण झाला होता. अनेक गावांमधून येणारे लोक तहसिल कार्यालयात आले की, हक्काने व विश्वासाने धारक साहेबांकडे जा असे सांगितले जात असे.

श्री. धारक यांच्या काम करण्याच्या पद्धतीत वेगळेपण जाणवत होते. कोणतेही काम असो, ते संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन काम पूर्ण करून घेत असत. हे काम लगेच करा असा स्पष्ट आदेश देत ते काम तात्काळ पूर्ण करून घेत. त्यामुळे नागरिकांना वारंवार कार्यालयाचे फेरे मारावे लागत नसत. ते स्वतः प्रत्येक कामात लक्ष घालत असत. एखादे काम अडले असल्यास त्यामागील कारण समजून घेऊन ते त्वरित मार्ग काढत. त्यामुळेच अनेक गुंतागुंतीची व प्रलंबित कामे सहज पूर्ण होत असत. त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे कार्यालयात कार्यक्षमतेचे वातावरण निर्माण झाले होते.

तहसिलदार सौ. वैशाली पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, मी जेंव्हा बैठकीसाठी किंवा कामानिमित्त दौऱ्यावर जायचे, तेंव्हा कार्यालयातील कामांची जबाबदारी श्री. धारक यांच्यावर निश्चिंतपणे सोपवत असे. मी फोन करून सांगितलेले कोणतेही काम त्यांनी कधीही टाळले नाही. त्यांनी कधी नाही असे उत्तर दिलेले मला आठवत नाही. त्यांनी प्रत्येक काम प्रामाणिकपणे व तत्परतेने पूर्ण केले. त्यामुळेच त्यांना शासन हे टोपणनाव मिळाले आहे. यावेळी तहसिल कार्यालयातील कर्मचारी बंधू-भगिनींनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, धारक साहेबांनी नेहमीच कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन काम केले. त्यांनी कधीही कोणावर अन्याय केला नाही. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यालयातील कामकाज सुरळीत झाले. त्यांनी सर्वांना समान वागणूक देत एक आदर्श निर्माण केला. त्यांच्या सहकार्यशील, संयमी व समंजस स्वभावामुळे कार्यालयात एक आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते.

सत्काराला उत्तर देताना श्री. भगीरथ धारक यांनी मनोगत व्यक्त करत सहकाऱ्यांना महत्त्वाचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले, खेड्यापाड्यातून येणारी सामान्य जनता मोठ्या अपेक्षेने आपल्या कार्यालयात येते. त्यांच्याशी आपुलकीने वागा, चांगले संभाषण करा आणि त्यांच्या अडचणी समजून घ्या. जनसेवा हीच ईश्वर सेवा या भावनेतून काम केल्यास कामाचे समाधान मिळते. ते पुढे म्हणाले, आपला तालुका मोठा आहे. अनेक लोक आपली कामे घेऊन येतात. त्यांच्याशी जिव्हाळ्याचे नाते ठेवा. त्यांची कामे आनंदाने करा आणि त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले, तर तेच आपले खरे यश आहे. लोकांचे आशीर्वाद मिळवा. तसेच त्यांनी हलक्या फुलक्या शैलीत सांगितले की, लोकांचे काम केल्यावर त्यांना हसून ओके म्हणा आणि थँक्यू सांगा. आपल्या तालुक्यातील लोक खूप चांगले आहेत. ते सहकार्य कधीही विसरत नाहीत. चांगल्या कर्मचाऱ्यांना ते डोक्यावर घेतात.

आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख करताना ते भावूक झाले. त्यांनी सांगितले की,

दि. २५ जानेवारी २०२६ रोजी माझ्या मुलीचा साखरपुडा झाला, तर दि. १३ मार्च २०२६ रोजी माझ्या आईचे निधन झाले. या आनंद व दुःखाच्या प्रसंगी सर्व क्षेत्रातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. हीच माझ्या चांगल्या कामाची पावती आहे. मी मोठा नेता किंवा अधिकारी नसूनही लोकांनी दाखवलेले प्रेम हीच माझी खरी श्रीमंती आहे. ही श्रीमंती पैशात मोजता येणार नाही, असे भावनिक शब्द त्यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी तहसिलदार श्रीम. वैशाली पाटील, नायब तहसिलदार श्रीम. अश्विनी पडोळे मॅडम, सहाय्यक महसूल अधिकारी नवनाथ सोनटक्के, जयदत्त चव्हाण, श्रीम. वाघमारे



मॅडम, श्रीम. अयोध्या विर मॅडम, दिलीप गालफाडे, संजय बहिरवाल, गारुळे साहेब, अशोक धोंडे, गोरे साहेब, रविंद्र ठाणगे, लिमसे साहेब, लोखंडे साहेब, सानप साहेब, जाधव साहेब, सुशिल शिंदे, सुशिल क्षिरसागर, अक्षय बोंदार्डे, नागेश जायभाये, रणंजित गुप्ता, नंदकुमार कदम, तोफीक साहेब, श्रीम. मिरा नजाम, श्रीम. निर्मला धोंडे, श्रीम. काळे मॅडम, श्रीम. गर्जे मॅडम, श्रीम. पिंपळे मॅडम, श्रीम. पूजा धोंडे, नामदेव भवर, मेंगडे साहेब, सतिश सायंबर, सोनटक्के साहेब, श्रीम. संगिता चितळे तसेच सर्व कर्मचारी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भावनिक वातावरणात पार पडलेल्या या सेवापूर्ती समारंभात श्री. भगीरथ धारक यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्यशैलीतून जनतेप्रती असलेली बांधिलकी, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव अधोरेखित झाला. त्यांच्या निवृत्तीनंतरही त्यांनी घालून दिलेला आदर्श आणि कामाची पद्धत पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# वाघोलीत रंगला कुस्तीचा महायज्ञ

## ६८ व्या.महाराष्ट्र केसरीने रचला आयोजनाचा नवा विक्रम!

आष्टी - (प्रतिनिधी) महाराष्ट्राच्या मातीतील शौर्य आणी परंपरेचा उत्सव म्हणजे महाराष्ट्र केसरी, या वर्षी वाघोली (पुणे) येथील स्व. अजितदादा पवार क्रीडानगरीत संपन्न झालेली ६८ वी. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा ही केवळ एक स्पर्धा ठरली नाही, तर तो कुस्तीचा एक ऐतिहासिक महोत्सव ठरला. मुख्य आयोजक आणी पुणे जिल्हा नियोजन समिती माजी सदस्य रामकृष्ण (अण्णा) सातव पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या हाय-टेक आयोजनाने कुस्ती क्षेत्रात नवी झळाळी मिळवून दिली आहे.

पुण्याच्या पूर्व हवेलीतील वाघोलीच्या मातीत गेली पाच दिवसांपासून शड्डुचा जो धूमकार ऐकू येत होता त्यात केवळ कुस्ती प्रेमींचीच नाही तर, अवघ्या महाराष्ट्राची पावलं वाघोलीकडे वळवली. ६८ व्या. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या निमित्ताने वाघोलीत खऱ्या अर्थाने कुस्तीचा महाकुंभ भरला होता. आधुनिकतेची कास धरलेली स्व. अजितदादा पवार क्रीडानगरीत, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. डोळ्याचं पारणं फेडणारे दोन मॅट आणि दोन मातीचे आखाडे आणी समोर लाखो कुस्तीशौकीनांचा अथांग सागर हे दृष्य पाहून अस वाटलं होत की, महाराष्ट्राची अस्मिता असलेली कुस्ती आता एका नव्या उंचीवर पोहोचली आहे, मात्र याच आखाड्यात नाशिक च्या हर्षवर्धन सदगीरनं विजयाची गदा उंचावली आणि त्याच क्षणी कुस्तीतून निवृत्ती जाहीर करून एका सुवर्ण पर्वाच्या समाप्तीची ही घोषणा केली.



स्पर्धेचा अंतिम टप्पा नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर आणी सोलापूर चा महेंद्र गायकवाड यांच्यातील अतीतटीच्या लढतीने गाजला. अनुभवाच्या जोरावर हर्षवर्धन याने ४.२ अशा गुणांनी विजय मिळवला आणी दुसऱ्यांदा मानाची चांदीची गदा उंचावली, पण त्याच क्षणी हर्षवर्धनने कुस्तीतून निवृत्ती जाहीर करून सर्वांनाच चकित केले. एका सुवर्ण पर्वाची ही अनपेक्षित पण दिमाखदार सांगता होती.

वाघोलीकरांचे शाही आदरातिथ्य - आयोजक रामकृष्ण (अण्णा) सातव पाटील आणी समस्त ग्रामस्थांनी केलेल्या नियोजनाची चर्चा संपूर्ण राज्यात झाली. विजेत्याला फॉर्च्यूनर गाडी आणि उपविजेत्याला स्कॉर्पिओ व इतर मल्लांना अठरा बुलेट गाड्यांचे बक्षीस देऊन कुस्तीगीरांचा खऱ्या अर्थाने सन्मान करण्यात आला.

महिला प्रेक्षकांसाठी केलेली स्वतंत्र बैठक व्यवस्था हे या स्पर्धेचे विशेष आकर्षक ठरले. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर महासंघाच्या मार्गदर्शनाखाली रामकृष्ण अण्णा यांनी या स्पर्धेचे नियोजन अशा पद्धतीने केले की, पूर्ण महाराष्ट्र थक्क झाला, फॉर्चूनर, स्कॉर्पिओ सारखी मोठी बक्षीसे आणी पाच माजी महाराष्ट्र केसरींचा एकाच मंचावर आणण्याचा ऐतिहासिक पराक्रम त्यांनी करून दाखवला. मल्लांना मान आणि कुस्तीला सन्मान हे ब्रीद त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केले. कुस्ती खेळात शक्ती सोबत उक्ती ची ही गरज असते, असे सांगणारे रामकृष्ण सातव पाटील आजच्या तरुण पिढी साठी आदर्श आहेत. व्यसनाधीनते पासून दूर राहून खेळाकडे वळावे, असा संदेश ते आपल्या कार्यातून देतात. वाघोलीच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतलेले हे नेतृत्व आगामी काळात क्रीडा, समाजकारण आणि राजकारणाच्या क्षेत्रात नवीन उंची गाठेल, यात शंका नाही.

ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी रामकृष्ण अण्णांनी पारितोषिकांचा पाऊस आणि हाय-टेक नियोजन आंतरराष्ट्रीय दर्जाचे होते म्हणून या स्पर्धेने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी लाल मातीतील कुस्तीला कॉर्पोरेट दर्जा आणी ग्ल्यामर मिळवून दिले. २५ वर्षांपूर्वीची कुस्ती आणी आजची कॉर्पोरेट स्वरूप धारण केलेली कुस्ती यात मोठा बदल झाला आहे. वाघोलीतील या महाकुंभाने सिद्ध केले की, कुस्ती हा खेळ आजही ग्रामीण महाराष्ट्राच्या हृदयाचा ठोका आहे. हर्षवर्धनची निवृत्ती ही एका पर्वाची अखेर असली तरी वाघोलीच्या या आखाड्याने नव्या पिढीच्या हजारो मल्लांच्या स्वप्नांना नवी उभारी दिली आहे, हे मात्र नक्की!

रामकृष्ण सातव पाटील यांचे प्रत्येक कार्य हे वाघोलीचे ग्रामदैवत वाघेश्वरांच्या चरणी अर्पण असते. वाघोलीच्या जत्रेपासुन ते पालखी सोहळ्यापर्यंत अण्णांचा सक्रीय सहभाग असतो. विशेष म्हणजे या भूमीला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने आणि बलिदानाने पवित्रता लाभली आहे, त्याच मातीत कुस्तीचा हा महायज्ञ करून रामकृष्ण अण्णांनी शिवशंभूच्या पराक्रमी वारशाचा सन्मान केला आहे. भक्ती आणि शक्तीचा संगम साधत त्यांनी वाघेश्वर मंदिर परिसराच्या शुशोभीकरणासाठी आणी गावातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, जुन्या वास्तूंच्या जतनासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे.

नियोजनाची भव्यता - वाघोलीतील या स्पर्धेसाठी ८० फूट बाय ४० फूट आकाराचे भव्य व्यासपीठ आणी हजारो लाखो प्रेक्षकांसाठी बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास तडस आणि इतर पदाधिकाऱ्यांनी रामकृष्ण अण्णांचे कौतुक केले आहे. स्पर्धेत पारदर्शकता राहावी या साठी डिजिटल स्कोअर बोर्ड आणि व्हिडीओ रिव्हयू अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला गेला. समाज सेवेचा विशाल वसा - केवळ क्रीडा स्पर्धाच नव्हे तर सामाजिक बांधिलकी म्हणून रामकृष्ण अण्णांनी नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. नियमित मोफत आरोग्य तपासणी, रक्तदान, डोळे तपासणी शिबिरांचे आयोजन, तरुणांना व्यसनांपासुन दूर ठेवण्यासाठी आधुनिक व्यायाम शाळांना, आखाडयांना बळ देणे, कोरोना सारख्या भीषण संकटात हजारो कुटूंबाना अन्नधान्य आणी औषधांचे वाटप. शक्ती सोबत युक्ती आणी शब्दाला कृतीची जोड हे अण्णांच्या कामाचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना अनेक क्रीडा भूषण आणि समाज गौरव पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. ६८ व्या. महाराष्ट्र केसरीच्या यशस्वी आयोजनाने त्यांच्या संघटन कौशल्यावर मोहर उमटवली असुन वाघोलीच्या विकासाचा हा विजयी रथ रामकृष्ण अण्णांच्या नेतृत्वाखाली अधिक वेगाने धावेल यात शंका नाही. लेखक - रामदास जाधव (जेष्ठ पत्रकार)

# विधीसंघर्ष बालकाकडुन चोरीच्या तीन दुचाकी हस्तगत

## दोन गुन्हे उघडकीस,स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

बीड ।प्रतिनिधी

परळी शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. १८/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अंतर्गत दाखल गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहीती मिळाली की सदरील गुन्हा हा एका विधीसंघर्ष बालकाने केला आहे.सदरील विधीसंघर्ष बालकाचे राहते घरी जावुन त्याचा शोध घेतला असता तो मिळुन आला.



त्याचेकडे सदरील गुन्हयातील एक दुचाकी व ईतर दोन असे एकुन तीन दुचाकी मिळुन आल्या, विधीसंघर्ष बालकाकडे चौकशी केली असता त्याने सदर तीनही मोटार सायकली परळी परीसरातून वेगवेगळ्या ठिकाणाहुन चोरी केल्याची कबुली दिली आहे. त्याचे ताब्यातुन एक स्कुटी व दोन मोटार सायकल अश्या एकुण तीन दुचाकी जप्त करुन पुढील तपासकामी पोलीस ठाणे परळी शहर यांचे ताब्यात देण्यात आल्या आहेत.

सदरील मिळालेल्या दुचाकीवरुन पोलीस ठाणेचा अभीलेख पडताळणी केली असता खालील गुन्हे उघडकीस आले आहेत. परळी शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. १८/२०२६ कलम ३०३ (२) भा. न्या.सं.,संभाजीनगर पोलीस ठाणे, गु.र.न ६९/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं.

सदरील कामगिरी ही नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि/ सुशांत सुतळे, विष्णु सानप, रामचंद्र केकान, गोविंद भताने, सचिन आंधळे, अतुल हराळे, मारोती कांबळे, दिलीप गिते, विकास राठोड यांनी मिळून केली आहे.

# आष्टीत भाजपचे विधानसभा अध्यक्ष गणेश नाना शिंदे यांचा नाभिक संघटनेकडून जंगी सत्कार

आष्टी - (राजेंद्र लाड) भारतीय जनता पक्षाच्या आष्टी, पाटोदा व शिरूर विधानसभा अध्यक्षपदी नुकतीच निवड झालेले गणेश नाना शिंदे यांचा आष्टी शहर नाभिक संघटनेच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला. त्यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत नाभिक समाजाने एकत्र येत अभिनंदनाचा वर्षाव केला.





या सत्कार सोहळ्यावेळी नाभिक संघटनेचे अध्यक्ष प्रवीण कदम, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, नाभिक संघटनेचे ज्येष्ठ नेते बाबुराव कदम, युवा नेते बबन कदम, पवन कदम, पांडुरंग दळवी, शरद राऊत, बाला कदम, अंबादास कदम, सागर कदम, बाळू कदम, विशाल कदम, जॉन कदम, दादा कदम, अक्षय कदम, किरण कदम, गोविंद कदम, गणेश राऊत, ओंकार कदम, विराज कदम, कृष्णा कदम, लखन कदम, सार्थक माने, शुभम राऊत, सारंग कदम, ऋषिकेश कदम, टायगर कदम, विजय कदम, भागवत कदम यांसह नाभिक समाजातील युवक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी गणेश नाना शिंदे यांच्या संघटन कौशल्याचे व कार्यतत्परतेचे कौतुक केले. समाजातील विविध घटकांना सोबत घेऊन विकासाभिमुख काम करण्याची त्यांची भूमिका प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

युवकांनी विशेषतः त्यांच्या नेतृत्वगुणांची प्रशंसा करत पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना गणेश शिंदे यांनी नाभिक समाजाच्या या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी व पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. हा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# टेंभुर्णी-जालना मार्गावर अपघातांचे सत्र सुरुच; सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष, प्रवाशांचा जीव टांगणीला





जाफराबाद /हरी भालके

जाफराबाद दि २. टेंभुर्णी ते जालना या मुख्य रस्त्यावर गेल्या काही दिवसांपासून अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. रस्ते सुरक्षा नियमांची ऐंशी-तैशी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (झथऊ) कमालीच्या दुर्लक्षामुळे हा मार्ग आता 'मृत्यूचा सापळा' बनत चालला असल्याचे चित्र दिसत आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.या मार्गावरील प्रवासादरम्यान रस्ते सुरक्षेच्या कोणत्याही नियमांचे पालन होताना दिसत नाही. रस्त्याच्या कडेला असलेले महत्त्वाचे दिशादर्शक फलक गायब आहेत, पुर्णा नदीच्या समोर असलेला खामखेडा फाटा, त्यांनतर गौरीशंकर महादेव मंदिर, व सावंगी - गोधनखेडा फाटा येथे गतिरोधक नसल्याने भरधाव वेगाने

वाहणे सुसाट पळतात.ज्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना वळणांचा अंदाज व गावांचा अंदाज येत नसल्याने वाहनांमध्ये अपघाताचे प्रमाण जास्त वाढले आहे.रस्त्याची देखभाल करण्याची जबाबदारी असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र, अद्यापपर्यंत विभागाकडून कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. केवळ रस्ता तयार करून जबाबदारी संपली, अशा आविर्भावात प्रशासन वागत असल्याची टीका केली जात आहे.

प्रवाशांची मागणी

या रस्त्यावर रोज छोटे-मोठे अपघात होत आहेत. जर तातडीने गतिरोधक बसवले नाहीत आणि रस्त्यावरील पिवळ्या पट्ट्यांचे काम केले नाही, तर आम्हाला तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा स्थानिक वाहनधारकांनी दिला आहे.

प्रशासनाने आता तरी जागे होऊन एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट न पाहता तातडीने या मार्गावर सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

*गतिरोधकांचा अभाव: जाफराबादहुन टेंभुर्णी कडे जात असताना पुर्णा नदीच्या समोर खामखेडा फाटा, त्यांच्या जवळ कलवातीगावाजवळील परिसर किंवा गर्दीच्या ठिकाणी आवश्यक असलेले गतिरोधक या मार्गावर नाहीत. यामुळे वाहने भरधाव वेगाने धावत असून पादचाऱ्यांचा जीव धोक्यात आला आहे.

* रस्त्याच्या मध्यभागी आणि कडेला असलेल्या पिवळ्या किंवा पांढऱ्या पट्ट्या पूर्णपणे पुसल्या गेल्या आहेत. पावसामुळे किंवा रात्रीच्या अंधारात रस्ता नेमका कुठे संपतो, हे न समजल्याने अनेक वाहने थेट खड्ड्यात किंवा रस्त्याच्या खाली कोसळत आहेत. * या मार्गावर अनेक ठिकाणी धोकादायक वळणे आहेत, मात्र तिथे कोणतेही 'रिफ्लेक्टर्स' किंवा इशारा देणारे बोर्ड लावण्यात आलेले नाहीत.

# झोक्याच्या दोरीचा गळफास ९ वर्षाच्या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू

माजलगाव ।प्रतिनिधी

शहरात घरात झोका खेळताना गळ्याला अचानक फास बसून अवघ्या ९ वर्षाच्या चिमुकलीचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.ही दुर्दैवी घटना माजलगाव शहरातील खंडोबा मैदान परिसरात मंगळवारी घडली. वृंदा समीर रूद्रवार (वय ९) असे मृत मुलीचे नाव आहे. भगवान महावीर जयंतीनिमित्त शाळेला सुट्टी असल्याने वृंदा आपल्या लहान बहिणीसोबत घराच्या वरच्या मजल्यावर झोका खेळत होती.

दरम्यान, झोका पकडण्यासाठी ती खुर्चीवर चढली असता खुर्ची अचानक कलंडली. यामुळे झोक्याचीदोरी तिच्या गळ्याभोवती अडकून गळफास बसला. या अपघातात तिचा जागीच मृत्यू झाला.काही वेळानंतर वृंदा जेवणासाठी खाली आली नसल्याने तिची आई वर गेली असता हा प्रकार उघडकीस आला. मुलीची अवस्था पाहून आईने आक्रोश केला. आवाज ऐकून कुटुंबीय व शेजारी घटनास्थळी धावले. त्यांनी तात्काळ वृंदाला रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.वृंदा ही 'ईगलवूड इंग्लिश स्कूल'मध्ये इयत्ता दुसरीत



शिक्षण घेत होती. तिच्या आकस्मिक निधनामुळे रूद्रवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

# धनश्री पतसंस्थेची आर्थिक भरारी कायम;६० लाखांचा नफा,८७.९२ कोटींचा भक्कम व्यवसाय - अध्यक्ष रंगनाथ धोंडे

आष्टी - (राजेंद्र लाड) आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदांचा दृढ विश्वास या त्रिसूत्रीवर उभी राहिलेली आष्टी येथील धनश्री पतसंस्था यंदाही आपल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे चर्चेत आली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अखेरीस संस्थेने तब्बल ६० लाख रुपयांचा निव्वळ नफा कमावत प्रगतीची परंपरा कायम राखली आहे. विशेष म्हणजे, गेल्या तब्बल २६ वर्षांपासून ३१ मार्च रोजीच ताळेबंद सादर करण्याची शिस्तबद्ध परंपरा संस्थेने यंदाही अखंडितपणे पाळली आहे.

संस्थेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष रंगनाथ धोंडे यांच्या हस्ते ताळेबंद सादर करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष लक्ष्मण सुरतवाले, सचिव जितेंद्र शिंदे, कडा शाखेचे शाखाधिकारी रमेश बोराडे यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात संस्थेच्या आर्थिक वाटचालीचा आढावा घेताना पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

अध्यक्ष रंगनाथ धोंडे यांनी सविस्तर माहिती देताना सांगितले की, संस्थेचा एकूण व्यवसाय ८७ कोटी ९२ लाख १४ हजार २५४ रुपयांवर पोहोचला आहे. यामध्ये ४८ कोटी ५८ लाख ५२ हजार २१२ रुपयांच्या ठेवींचा समावेश असून, ठेवीदारांचा संस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर ३९ कोटी ३३ लाख ६२ हजार ४२ रुपयांचे कर्जवाटप करून विविध घटकांना आर्थिक पाठबळ देण्यात आले आहे. तसेच १८ कोटी ६५ लाख ४६ हजार ७६७ रुपयांची गुंतवणूक करून संस्थेने आर्थिक स्थैर्य अधिक मजबूत केले आहे. संस्थेचा स्वनिधीही सातत्याने वाढत असून तो यंदा ५ कोटी ३८ लाख २७ हजार ४९७ रुपयांपर्यंत पोहोचला आहे. या भक्कम भांडवलामुळे संस्थेला कोणत्याही आर्थिक आव्हानांना

धनश्री बिगरशेती नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, आष्टी
सहकारातून ग्रामविकास



समर्थपणे तोंड देण्याची ताकद प्राप्त झाली आहे. या सर्व घटकांच्या एकत्रित परिणामामुळेच संस्थेला ६० लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळवता आला असल्याचे धोंडे यांनी नमूद केले.संस्थेच्या यशामागे काटेकोर कर्जवाटप धोरण, नियमित वसुली, पारदर्शक लेखा पद्धती आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर ही प्रमुख कारणे असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. ग्रामीण व शहरी भागातील लघु उद्योजक, शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर व सुलभ कर्जपुरवठा करून संस्थेने स्थानिक अर्थचक्राला गती दिली आहे.

सचिव जितेंद्र शिंदे यांनी संस्थेच्या आर्थिक सूचकांची माहिती देताना सांगितले की, थकबाकी केवळ २ टक्के इतकी मर्यादित ठेवण्यात संस्थेला यश आले आहे, तर एनपीए (अप्राप्त कर्ज) फक्त ३ टक्क्यांपर्यंत नियंत्रणात आहे. सिडी रेशो ६८ टक्के असून कर्जवाटप आणि ठेवी यामधील संतुलन चांगले राखले गेले आहे. सीआरएआर २८ टक्के इतका मजबूत असल्याने संस्थेची भांडवली क्षमता सक्षम असल्याचे दिसून येते.

गेल्या २६ वर्षांपासून ३१ मार्चलाच ताळेबंद सादर करण्याची परंपरा आम्ही जपली आहे. ही केवळ परंपरा नसून संस्थेच्या शिस्तीचे आणि पारदर्शकतेचे प्रतीक आहे. ठेवीदार, कर्जदार आणि सभासदांनी दाखविलेल्या विश्वासामुळेच आम्ही ही प्रगती साध्य करू शकलो, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. आर्थिक प्रगतीसोबतच धनश्री पतसंस्थेने सामाजिक बांधिलकीही जपली आहे. वृक्षलागवड, पर्यावरण संवर्धन, सामाजिक उपक्रम, शैक्षणिक मदत आदी विविध क्षेत्रांमध्ये संस्थेने सातत्याने योगदान दिले आहे. शहराच्या सर्वांगीण विकासात आपला वाटा उचलण्याचा संस्थेचा प्रयत्न कायम राहिला आहे. एकूणच, मजबूत आर्थिक पाया, पारदर्शक कारभार, उत्कृष्ट व्यवस्थापन आणि सभासदांचा विश्वास या सर्व घटकांच्या बळावर धनश्री पतसंस्था आष्टी परिसरातील एक विश्वासार्ह आणि प्रगतिशील वित्तीय संस्था म्हणून आपली ओळख अधिक दृढ करत असल्याचे या कामगिरीतून अधोरेखित झाले आहे. आगामी काळातही ही प्रगती अधिक वेगाने सुरू राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.